




# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ११ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## परभणीमध्ये संचारबंदी, इंटरनेटही बंद : आंदोलकांकडून दुकानांची जाळपोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११परभणी**

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर ठेवलेल्या संविधानाची एका माथेफिरुने विटंबना केली. या घटनेनंतर परभणी शहरातील आंबेडकरी अनुयायी संतप्त झाले आहेत. आज परभणी बंदची हाक देण्यात आली होती. मात्र या आंदोलनाला आक्रमक वळण लागले आहे. काही आंदोलकांकडून दुकानांची जाळपोळ करण्यात आली. यानंतर पोलिसांनीही आंदोलकांना पांगवण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. यामुळे सध्या परभणीत तणावपूर्ण स्थिती पाहायला मिळत आहे.





परभणीतील बंदला हिंसक वळण लागले आहे. आंदोलकांकडून शहरातील काही दुकानांची तोडफोड करण्यात आली. तर काही ठिकाणी वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांकडून अश्रू धुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. मात्र, जमावाकडून पोलिसांच्या दिशेने दगडफेक करण्यात आली. दंगल नियंत्रक पथकाला पाचारण करण्यात आले असून परिस्थिती नियंत्रणात आली आहे.

दरम्यान, आंदोलकांमध्ये महिलांचा देखील समावेश आहे. अनेक महिला रस्त्यावर उतरल्या. त्यांनीही पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली. परभणी बंद असताना जी दुकाने सुरू होती, अशी दुकाने आंदोलकांनी पेटवून दिल्याची माहिती आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात हा प्रकार घडला.

परभणी शहर बंद दरम्यान, काही मोर्चेकरी महिला थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या. यावेळी पोलिसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु, महिला आक्रमक झाल्याने पोलिसांनी त्यांना आत सोडले. कार्यालयात शिरल्यानंतर आंदोलक महिलांनी जोरदार घोषणाबाजी केली. काही मोर्चेकरांकडून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तोडफोड करण्यात आल्याची माहिती आहे.

**परभणीत संचारबंदी लागू**

परभणीमध्ये आज आंबेडकरी अनुयायांकडून पुकारण्यात आला होता. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले होते. परंतु, या आदेशाला न जुमानता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याशेजारी मोठ्या प्रमाणात जमाव जमला होता. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

**पुढील आदेशापर्यंत इंटरनेटही बंद**

परभणीतील सध्याची परिस्थिती पाहता जिल्हा प्रशासनाच्या वतीने बुधवारी दुपारी १ वाजेपासून इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. पुढील आदेश येईपर्यंत इंटरनेट सेवा बंद राहील, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने एका पत्रकाद्वारे सांगण्यात आले आहे.परभणी शहरातील सात ठिकाणी जाळपोळ करण्यात आली. अनेक ठिकाणी बॅनरची तोडफोड करून रस्त्यावर पेटून देण्यात आले आहेत. अग्निशमन दलाच्या वतीने या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. परभणीतील आंदोलनाला हिंसक वळण आले असून ठिकठिकाणी जाळपोळ करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांकडून परभणीतील रस्त्यावर मार्च काढण्यात येत आहे.

## मविआचे खासदार भाजपाच्या संपर्कात ?
## शरद पवारांना पुन्हा एकदा धक्का देण्याची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

विधानसभा निवडणुकीत महायुतीने २३० हून अधिक जागा मिळवून बहुमतासह राज्यात सरकार बनवलं आहे. त्यातच मविआचे अनेक खासदार भाजपाच्या संपर्कात आले आहेत. विशेषत: शरद पवार गटाचे खासदार भाजपा नेत्यांच्या संपर्कात असल्याने भाजपा पवारांना पुन्हा एकदा धक्का देण्याच्या तयारीत आहे.

याबाबत भाजपा नेते प्रवीण दरेकर म्हणाले की, निश्चितपणे मविआचे खासदार-आमदार भाजपाच्या संपर्कात आहेत. मविआचे खासदार विशेषत: शरद पवारांचे खासदार आहेत तिथे महायुतीचे आमदार निवडून आलेत. विकास त्यांच्यासाठी महत्त्वाचा आहे. पुढील राजकीय भवितव्याचा विचार करत ते हालचाली करत आहेत. केंद्रात भाजपा युतीचं आणि राज्यात भाजपा महायुतीचं सरकार आहे त्यामुळे कार्यकर्त्यांचा आग्रह, ज्यासाठी आपण निवडणूक लढवतोय तो विकास त्यातून शरद



पवारांच्या पक्षातील खासदार भाजपासोबत येण्याचा विचार करू शकतात असं त्यांनी सांगितले.

तसेच सत्तेच्या माध्यमातून गतीने विकास करता येतो. केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांचं भक्कम सरकार असल्याने विकास मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. त्यामुळे शरद पवार यांच्या पक्षातील असो वा मविआचे खासदार भाजपा नेतृत्वाच्या संपर्कात राहणे स्वाभाविक आहे असंही भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांनी म्हटलं.

दरम्यान, भाजपाचं केंद्रातील सरकार चंद्राबाबू आणि नितीश कुमार यांच्या कुबड्यावर उभे आहे. त्या कुबड्या कधीही गळून पडतील अशी भीती त्यांना आहे. त्यामुळे अशाप्रकारे ते प्रयत्न करतायेत. भाजपाला नैतिकता नाही. भाजपाकडून असे प्रयत्न सुरू राहणार आहे. ५० कोटी खोके देऊन कसं आमदारांना गुवाहाटीला पळवलं, राज्यात सरकार बनवले. मी पुन्हा येईन म्हणणारे ईव्हीएमच्या जोरावर परत आलेत. अनैतिक सरकारचे असे प्रयत्न भाजपाचे सुरू राहणार आहेत. महाराष्ट्रातील सरकार मजबूत असले तरी केंद्रातील सरकार मजबूत नाही त्यांना काही खासदारांची गरज लागेल म्हणून ते अशाप्रकारचे प्रयत्न करत असतील परंतु त्यांना यश मिळणार नाही असं राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या विद्या चव्हाण यांनी म्हटलं आहे.

## काँग्रेसचे काही आमदार-खासदार अस्वस्थ; बावनकुळेंचं सूचक विधान, राजकीय वर्तुळात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दारूण पराभवानंतरही कदाचित महाविकास आघाडीच्या नेत्यांनी काही धडा घेतलेला दिसत नाही. अशातच आता भाजप महाविकास आघाडीला मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याचं म्हटलं जात आहे. विधानसभेतील पराभवानंतर मविआतील काही खासदार भाजपच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाजपकडून महाराष्ट्रात 'ऑपरेशन लोटस' राबवले जाणार असल्याची शक्यता आहे. यावर बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसचे खासदार आम्हाला भेटत असतात असं



म्हटलं आहे. तसेच आम्हाला ऑपरेशन वगैरे करायची गरज पडत नसल्याचेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

खोटारडेपणातून त्यांना काही मतं मिळाली आहेत. आता त्यांच्याच निवडून आलेल्या खासदारांना वाटतं की काँग्रेसमध्ये राहून आमचं भविष्य चांगले नाही. त्यामुळे काँग्रेसचे अनेक नेते आणि प्रतिनिधी आम्हाला भेटत असतात. भेटल्यावर त्यांचे दुःख ते मांडत असतात. काँग्रेसचे नेतृत्वाकडून निवडून आलेल्या आमदार खासदारांवर दुर्लक्ष होत आहे. काही लोक अस्वस्थ आहेत, असं चंद्रशेखर बावनकुळेंनी म्हटलं.

त्यांना त्यांची माणसं सांभाळता येत नाही हा प्रश्न आहे. आम्हाला ऑपरेशन वगैरे करायची गरज पडत नाही. आम्ही कधी त्यामध्ये पडतही नाही. ईडी, सीबीआयचे त्यांचे नेहमीचे रडगाणं आहे. आम्ही कधी ईडी, सीबीआयकडे गेलेलो नाही. तपास यंत्रणा त्यांचे काम वेगळं करत असतात. पण निवडून आलेले प्रतिनिधी सांभाळता येत नाही हे महाविकास आघाडीचे अपयश आहे. त्यांचे निवडून आलेले प्रतिनिधी अस्वस्थ आहेत. ते आम्हाला भेटून सांगतात की आम्हाला कुणी विचारत नाही, आमचा पक्ष जनप्रितिनिधी म्हणून प्रोत्साहन देत नाही. विकासकामे करण्यासाठी कुठल्याही पद्धतीचे समर्थन करत नाही. त्यामुळेच ते अस्वस्थ आहेत, असंही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

**भाजपमध्ये नैतिकता नावाचा प्रकार नाही**

भारतीय जनता पक्ष अशी कोणतीही ऑपरेशन्स करू शकतो. त्यांच्याकडे पैसा आहे. त्यांच्याकडे मोठी यंत्रणा आहे. दहशत निर्माण करून अशा प्रकारे माणसं फोडणे ते करू शकतात. याआधी देखील एकनाथ शिंदे यांच्यासारखे किंवा अजित पवार यांच्यासारखे लोक का त्यांच्यासोबत गेले? ते देखील भीतीपोटीच भाजपसोबत गेले. ते काय ऑपरेशन लोटस होतं का तर नाही. ते ऑपरेशन डर होतं. भीती दाखवायची आणि पळवायचं आणि मग तुम्ही तिथे गेल्यावर सर्व खटले मागे घ्यायचे. तुमची जप्त केलेली संपत्ती परत द्यायची. हे यांचे धंदे आहेत. नैतिकता नावाचा कोणताही प्रकार मला भारतीय जनता पक्षाच्या सत्तेमध्ये दिसत नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

## मंत्रिमंडळ विस्तारापूर्वी फडणवीस-पवार दिल्ली दौऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

महायुती सरकारचा शपथविधीनंतर आता संपूर्ण महाराष्ट्राच्या लक्ष मंत्रिमंडळ विस्तारावर लागले आहेत. या महिन्यात विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन आहे, त्यापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार दिल्ली दौऱ्यावर गेले आहेत. मात्र, शिवसेना पक्षप्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुंबईतच आहे. मुख्यमंत्री बनल्यानंतर देवेंद्र फडणवीस पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेणार असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने पीटीआयला सांगितले आहे.

## देवेंद्र फडणवीसांनी काढली शिंदेंच्या शिलेदाराकडून वैद्यकीय कक्षाची जबाबदारी; नव्या पदाधिकाऱ्याची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नागपूर**

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आता मंत्रालयातील विविध विभागांमध्ये आपल्या मर्जीतील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यास सुरुवात केली आहे. फडणवीस यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या प्रमुखपदावरून मंगेश चिवटे यांना हटवत रामेश्वर नाईक यांची नियुक्ती केली आहे. रामेश्वर नाईक यांनी देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री असताना उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची जबाबदारी



सांभाळली होती. त्यामुळे फडणवीस यांनी नाईक यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना आता मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची जबाबदारी सोपवली आहे. तसंच सद्यस्थितीत नाईक यांच्याकडेच उपमुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाचीही जबाबदारी आहे.

एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये मुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्यानंतर मंगेश चिवटे यांची मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाच्या प्रमुखपदी निवड केली होती. चिवटे यांनीच सर्वप्रथम २०१५ साली तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची संकल्पना मांडली होती. मंगेश चिवटे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे काही महिन्यांनंतर ही संकल्पना पूर्णत्वास येऊन सदर कक्षाची स्थापना झाली. तेव्हापासून या कक्षाद्वारे गोरगरीब रुग्णांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

दरम्यान, राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यानंतर मंगेश चिवटे यांच्याकडेच या कक्षाची जबाबदारी देण्यात येईल, अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या जवळच्या अधिकाऱ्यावर विश्वास दर्शवत रामेश्वर नाईक यांची कक्षप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे.

## विठुरायाचे आता दोन तासात घेता येणार दर्शन
## बालाजी, वैष्णो देवीच्या धर्तीवर टोकण दर्शन व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११पंढरपूर**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या विठुरायाचे दर्शन आता अवघ्या दोन तासात मिळणार आहे. यासाठी मंदिर समितीने बालाजी आणि वैष्णो देवीच्या धर्तीवर पंढरपुरात टोकण दर्शन व्यवस्था सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या माघवरीला प्रायोगिक तत्त्वावर टोकण दर्शन व्यवस्था सुरू करण्यात येणार आहे.

पंढरीच्या सावळ्या विठुरायाच्या दर्शनासाठी आषाढी, कार्तिकी वारीला येत असतात. या वारीच्या व्यतिरिक्त वर्षभर भाविकांची पंढरीत अलोट गर्दी



पाहण्यास मिळत असते. विठुरायाच्या दर्शनासाठी येणारे लाखो भाविक उन, वारा, थंडी, पाऊस याची कोणतीही तमा न बाळगता तासन् तास दर्शन रांगेत उभे राहतात. आषाढी, कार्तिकी यात्रे दरम्यान तर २० ते २२ तास दर्शनासाठी लागतात. तरी देखील भाविक दर्शन घेतल्याशिवाय जात नाही. भाविकांना दर्शनासाठी लागणारा वेळ कमी करण्याबरोबरच दर्शन रांगेत उभे राहण्याचा भाविकांचा त्रास कमी करण्यासाठी मंदिर समितीकडून टोकण दर्शन व्यवस्था सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बालाजी व वैष्णो देवी येथे असलेल्या व्यवस्थेप्रमाणे टोकण दर्शन व्यवस्था सुरू झाल्यानंतर भाविकांचा दर्शन रांगेत उभे राहण्याचा त्रास कमी होणार आहे. यामुळे अवघ्या दोंन तासांमध्ये विठुरायाचे दर्शन होणार आहे.

## स्कूलबस आणि दुचाकीची धडक, युवकाचा मृत्यू; चिखली राज्य मार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११बुलढाणा**

बुलढाणा-चिखली राज्य मार्गावर आज झालेल्या अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. बुलढाणा नजीकच्या येळगाव नजीक एका शैक्षणिक संस्थेची बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन ही दुर्घटना घडली. आज बुधवारी, ११ डिसेंबर रोजी झालेल्या या दुर्देवी अपघातात येळगाव जवळील आश्रम शाळेजवळ ही घटना घडली. अपघातात




ठार झालेला तरुण हा बुलढाणा तालुक्यातील खूपगाव येथील रहिवासी असून जिवन इंगळे असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे.

बुलढाणा नजीकच्या सागवान येथील शिवसाई ज्ञानपीठ संस्थेची बस आणि मोटरसायकलची समोरासमोर धडकून हा अपघात झाला. अपघात झाल्यावर घटनास्थळी नागरिकांनी धाव घेतली. अपघातात दुचाकीची मोडतोड होऊन युवक जागीच दगावला. काही जवाबदार नागरिकांनी घटनेची माहिती बुलडाणा शहर पोलिसांना दिली. शहर पोलिसांच्या पथकाने तात्काळ येळगाव गाठून घटनास्थळचा पंचनामा केला. वृत्त लिहिपर्यंत पोलीस कारवाई सुरू असल्याने पोलीस कारवाईचा तपशील मिळू शकला नाही.

## संपादकीय ......

# नाचता येईना, अंगण वाकडे

विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षाने सत्तेवर येण्याची स्वप्ने बघितली होती, महायुतीचे सरकार सत्तेवरून हटणार असे गृहीत धरूनच महाआघाडीचे नेते स्वप्नरंजनात दंग होते. निकालानंतर मुख्यमंत्री कोणाचा, या प्रश्नावर आघाडीच्या तीनही पक्षांत चर्चा चालू होती. माजी मुख्यमंत्री व उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मुख्यमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा आहे हेही लपून राहिले नव्हते. निवडणूक काळात ते वारंवार काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवा असा आग्रह करीत होते, कुणालाही मुख्यमंत्री ठरवा आपण लगेचच आपला पाठिंबा जाहीर करू, असे सांगण्याची घाई त्यांनी केली. शरद पवार असोत किंवा नाना पटोले, दोघेही ठाकरेंच्या हट्टापुढे नमले नाहीत. निकालानंतर आघाडीच्या सर्वच नेत्यांचे चेहरे पडले. विधानसभेत बहुमताची संख्या गाठू असे मुठी आवळून सांगणाऱ्या महाआघाडीच्या तीनही पक्षांना मिळून राज्यात पन्नास जागाही जिंकता आल्या नाहीत. दारुण पराभव झाल्यावर त्याची कारणे शोधण्याऐवजी विरोधी पक्षांनी मुठी आवळत पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडायला सुरुवात केली आहे.

पराभव झाला की सवयीप्रमाणे विरोधी पक्ष ईव्हीएमवर खडे फोडणार याचा अंदाज भाजपाला होताच, पण मीडिया व सर्वसामान्य जनतेला ते ठाऊक होते. म्हणूनच विरोधी पक्ष ईव्हीएमवर अविश्वास प्रकट करीत असला तरी जनतेने मात्र मतदानातून विरोधी पक्षावर अविश्वास नोंदवला आहे. निवडणूक काळात महाआघाडीच्या नेत्यांनी महायुतीच्या सरकारवर भरपूर तोंडसुख घेतले. पण लाडकी बहीण योजनेने सर्व विरोधकांची गोची करून टाकली. अखेर आम्ही सत्तेवर आल्यावर लाडक्या बहिणींना तीन हजार रुपये महिना देऊ असेही आमिष महाआघाडीने मतदारांना दाखवले. पण महायुतीच्या प्रामाणिकपणावर मतदारांनी अधिक विश्वास दाखवला व महाआघाडीचे आश्वासन म्हणजे लबाडा घरचे निमंत्रण हे मतदारांनी ओळखले. सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी गाव गेले आठवडाभर राजकारणात केंद्रस्थानी आले आहे.

ईव्हीएमविरोधात रान पेटवायला महाआघाडीच्या नेत्यांना मारकडवाडी ग्रामपंचायतीच्या ठरावामुळे एक कोलीतच मिळाले. ईव्हीएमला विरोध करणारे गाव अशी मारकडवाडीची प्रसिद्धी देशभर झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) चे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विजयसिंह मोहिते पाटील अशा ज्येष्ठांनी मारकडवाडीकडे कूच केल्याने या गावाचे व विषयाचे महत्त्व वाढले. मारकडवाडीचा विरोध म्हणजे सर्व राज्यातील गावांचा ईव्हीएमला विरोध असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी चालवला आहे. अशा विरोधी मोहिमेमुळे आपण देशाच्या निवडणूक आयोगावर व निवडणूक यंत्रणेवर अविश्वास प्रकट करीत आहोत, याचे तारतम्यही नेत्यांना नसावे याचे मोठे आश्चर्य वाटते. पोस्टल मतदानात महाआघाडीच्या उमेदवाराला जास्त मते मिळाली, पण ईव्हीएमच्या मोजणीत कमी मते मिळाली असा दावा करणे किंवा तशी आकडेवारी पुरावा म्हणून देणे हे संयुक्तिक नाही.

पराभवानंतर ईव्हीएम विरोधात सुरू केलेली मोहीम ही देशातील जनतेची दिशाभूल करणारी आहे, याचेही भान आघाडीच्या नेत्यांना राहिलेले नाही. ईव्हीएमला महाराष्ट्रात महाआघाडी विरोध करीत आहे, तर उद्या देशपातळीवर काँग्रेसच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडी ईव्हीएम विरोधात मोहीम चालवणार आहे का? तसे झाले तर त्याचे काय परिणाम होतील याची कल्पना आघाडीच्या नेत्यांना आहे का? ईव्हीएममध्ये गैरप्रकार घडले किंवा ती यंत्रणा मॅनेज केली म्हणून महायुतीचे उमदेवार मोठी आघाडी घेऊन निवडून आले किंवा महाआघाडीचे उमेदवार मोठ्या मताधिक्यांना पराभूत झाले असे विरोधक भासवत आहेत. काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस (शप)चे रोहित पवार किंवा उबाठा सेनेचे आदित्य ठाकरे निवडून आले तेही ईव्हीएममधील गैरप्रकारांनी का? विधानसभा निवडणुकीत दणदणीत पराभव झाल्यानंतरच विरोधकांनी ईव्हीएमविरोधात आक्रोश करायला सुरुवात केली आहे. जेव्हा विरोधी पक्षाला चांगले मताधिक्य मिळते व सत्ता काबीज करता येते तेव्हा ईव्हीएम चांगली असतात, पराभव झाली की ती वाईट कशी ठरतात? सर्वोच्च न्यायालयानेही याच

# शतकापूर्वीच संत गुलाबराब महाराजांनी ओळखले स्त्री महत्व- हभप-नयना बच्चू कडू

## स्त्री महत्व पटविण्यासाठी अवलंबले स्त्री रूपगुलाब गौरव कथेचे पाचवे पुष्प

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ चांदुर बाजार–** शरीराने पुरुष व मनाने स्त्रीत्वाचा पूर्ण भाव आपल्या अंतकरणांमध्ये धारण करणारे व या जगतामध्ये स्त्री जीवनाच्या संपूर्ण उत्कर्षाकर्ता श्री गुलाबराव महाराजांचे शंभराव्या वर्षाच्या पूर्वीच अभूतपूर्व योगदान आहे.जेव्हा स्त्रीला चूल आणि मूल एवढाच दर्जा दिला जायचा तेव्हा गुलाबराब महाराजांनी स्त्री महत्व ओळखून स्त्री ही या जगाची जननी असून तीच तीचा सन्मान करण्याबाबतचे मत तेव्हा व्यक्त केले होते.माधान येथे सुरू असलेल्या गीता जयंती महोत्सवात गुलाब गौरव कथेच्या माध्यमातून हभप नयना बच्चू कडू यांनी आज पाचवे पुष्प गुंफले. ५ ते १२ डिसेंबर दरम्यान भक्तीधाम येथे सुरू असलेल्या गीता जयंती महोत्सवाच्या दरम्यान हभप नयना कडू यांनी संत गुलाबराव महाराज यांच्या अनेक सामाजिक पैलूंना भाविकांसमोर मांडले. श्री गुलाबराव महाराजांचे स्त्री विषयक विचार सांगत असताना स्त्रियांच्या जीवनामध्ये असणारा समतोल हा किती महत्त्वाचा आहे याचं उदाहरणासहित स्पष्टीकरण हभप नयना कडू यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये केलेला आहे. कथा श्रवणाच्या भागांनी श्री गुलाबराव



महाराजांच्या छोट्या छोट्या चरित्रात्मक कथांचा भावपूर्ण प्रवाह आपल्या उगवत्या वाणीमध्ये वर्णन करत असताना श्री गुलाबराव महाराजांचा प्रत्यक्ष अनुभव त्या ठिकाणी असणाऱ्या श्रोते वृंदांच्या चक्षुपटलावरती येत आहे.

तरुण मंडळींनी परमार्थ करताना कोणकोणते निर्णय विवेक बुद्धीने घ्यावे याचाही विचार सुद्धा नयना कडू यांनी व्यक्त केले. श्री गुलाबराव महाराजांचा स्वमत निर्णय सारखा ग्रंथ ज्यामध्ये सूत्रात्मक पद्धतीने अनेक विषयांचे प्रतिपादन श्री गुलाबराव महाराजांनी संस्कृत भाषेमध्ये केलेला आहे. साधू बोध,भागवत, भक्ती, सौरभ, समीक्षा पत्र अशा अनेक ग्रंथांद्वारे श्री गुलाबराव महाराजांच्या सर्व विद्या वैभवाचे दर्शन हभप नयना कडू या आपल्या कथा भावामध्ये प्रगट करत आहे. भारतीय संस्कृती अचाट आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणारी आहे याचा पुरस्कार सकलसंतांनी आपल्या साहित्य तपाच्या द्वारे या भू मंडळामध्ये प्रगट केलेला आहे. भारत हा देश पुरोगामी विचारांचा नाही तर तो प्रतीक्षणा वर्धमान या न्यायाने प्रत्येक वेळेस नावीन्यपूर्ण अशा चेतनेचा अविष्कार आहे.यामध्ये स्त्रीच जीवन हे सर्वोत्तम आहे. म्हणून भारतीय संस्कृतीने स्त्रियांचा कधी अवमान केला नाही उलटपक्षी स्त्री सर्वतो परिबंधनीय आहे याचा पुरस्कार अनादी काळापासून गार्गी, मैत्री, सीता, द्रोपदी यासारख्या चरित्रांद्वारे ते प्रगट झालेले आहेत. मध्यवर्गीय काळ जो स्त्री विषयांच्या संदर्भामध्ये नाना प्रकारचे शंका कुशंका प्रगट करते अशा शंकांच्याद्वारे स्त्री जीवनाच्या संदर्भातले संभ्रम या समाज मनातल्या अनेक लोकांच्या अंतकरणांमध्ये विंबवल्या गेले. प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराजांनी या सर्व विषयांना पूर्णविराम देण्याकरिता स्वयम स्त्रीवेश धारण करून भक्ती तत्वातलं आणि प्रेम तत्वातलं निष्कलंक असे चरित्र स्त्रियांचच असू शकतं आणि ते समर्पित जीवन या जगतामध्ये भारतासारख्या देशाशिवाय अन्यत्र त्या ठिकाणी दिसत नाही. पतिव्रता धर्म आचरण धर्म आणि समर्पण धर्म या तीन गोष्टींमुळे अनेक पिढ्यांचे संस्करण करण्याचं दायित्व स्त्रियांमध्ये आहे.आणि हे त्यांचे सामर्थ्य कुशलतेने त्यांच्या स्वभावामध्ये नैसर्गिकरित्या आलेला आहे. वृद्ध मंडळी व आपल्या जीवनाच्या सर्व वहिवाटी पूर्ण करत अनुभवाच्या एका मार्गदर्शकाच्या भूमिकेमध्ये असणाऱ्यांनी काय करावे आणि काय करू नये या संदर्भातला उत्तम मार्गदर्शन प्रवचनाच्या द्वारे नयना कडू यांनी स्वतः त्या ठिकाणी दिले.या प्रवचन व व्याख्यानासाठी स्त्रीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते तसेच पुरुषवर्ग सुद्धा अत्यंत एकाग्रतेने या कथेचा श्रवण करत आहे.श्री गुलाबराव महाराजांच्या चरित्र कथेचा हा प्रवाह प्रथमताच भक्तीधामच्या व्यासपीठावरती हभप नयना कडू यांच्या मुखाद्वारे प्रवाहित होत आहे. अनेकांनी श्री गुलाबराव महाराजांच्या सुक्ष्मातील सूक्ष्म चरित्रांचे वर्म मर्म जाणून घेण्याकरता आपल्या दैनंदिन जीवनातला वेळ काढून त्या ठिकाणी श्री महाराजांच्या कथा भावाला आपल्या अंतकरणात धारण केलेलं आहे.

# गहू पिकावरील करपा रोगासह किडींचे नियंत्रण कसे करावे? जाणून घ्या सविस्तर

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक** – पेरण्याची लगबग सुरु आहे. यातील गहू पिकाच्या व्यवस्थापनासाठी विशेष काळजी घेणे महत्वाचे ठरते. या काळात वातावरणात नेहमीच बदल जाणवत असतो. अशावेळी रोग किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. गहू पिकावरील करपा रोगासह किडींचे नियंत्रण कसे करावे, हे जाणून घेऊयात....

**रोग नियंत्रण**

गहू पिकास काळा व नारंगी तांबेरा, करपा, गव्हाच्या दाण्यावरील काळे टोक या रोगांमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची संभावना असते.

या रोगांपैकी काळा व नारंगी तांबेरा या दोन्ही महत्त्वाच्या हानीकारक रोगांमुळे ९० टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.

तांबेरा रोगापासून बचाव करण्यासाठी विद्यापीठाने विकसित केलेल्या तांबेरा प्रतिबंधक वाणांचीच पेरणीसाठी निवड करावी.

तांबेरा रोग नियंत्रणासाठी तांबेरा रोगाची लागण दिसून येताच मॅन्काझेब ७५ टक्के डब्ल्यु पी. ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून

### विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

किंवा टेब्युकोनॅझोल ५०% + ट्रायफ्लोक्झीस्ट्रोबीन २५% डब्ल्यु. जी. १० ग्रॅम / १० लिटर पाणी या संयुक्त बुरशीनाशकांची फवारणी करावी.

करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच कॉपर ऑक्सिक्लोराईड + मॅन्कोझेब या बुरशीनाशकाच्या प्रत्येकी २० ग्रॅम १० लिटर पाण्यातून दोन फवारण्या १५




दिवसांच्या अंतराने कराव्यात,

किंवा क्रेसोक्झिम मिथील ४४.३ टक्के एस.सी. या बुरशीनाशकाची १० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

**शिफारस–** गव्हाच्या खोडावरील तांबेरा रोगाचे व्यवस्थापन करणे, अधिक धान्य उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी, रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच व त्यानंतर १५ दिवसांनी टेबुकोनॅझोल ५०% + टायफ्लोझिस्टोबिन २५% डब्लू जी या संयुक्त बुरशीनाशकाची ६ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारण करावी.

**कीड संरक्षण–** गहू या पिकास मावा, खोडमाशी व खोडकिडा यांचेपासून नुकसान पोहोचते.

मावा, खोडमाशी व खोडकिडा यांचे पेरणीनंतर तीन आठवड्यापर्यंत प्रादुर्भाव झाल्यास जास्त नुकसान होऊ शकते.

मावा कीड दिसून येताच मेटारायझियम ॲनिसांप्ली ५० ग्रॅम किंवा बिव्हेरिया बेसियाना ५० ग्रॅम किंवा व्हरटीसिलीयम लेकॅनी ५० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

मावा किडीचे रासायनिक पद्धतीने नियंत्रण करण्यासाठी थायामेथोझॅम २५ टक्के विद्राव्य दाणेदार १ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून गरजेप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने एक किंवा दोन फवारण्या करूयात.

गहू साठवणुकीच्या काळात सोंडे किडीच्या नियंत्रणासाठी उन्हात वाळविलेल्या बियाण्यास वेखंड भुकटी १० ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बियाण्यात मिसळावे.

**– डॉ. योगेश पाटील, डॉ. भानदुास गमे आणि प्रा. भालचंद्र म्हस्के**

जिल्हा विस्तार केंद्र, कृषी संशोधन केंद्र, निफाड, जि. नाशिक




## रोज ३० दिवस कढीपत्त्याचे पाणी प्या, आरोग्याशी संबंधित अर्ध्या समस्या होतील दूर...

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

वणाची चव वाढवण्यासाठी तुम्ही अनेकदा कढीपत्ता वापरत असाल, पण तुमच्या रोजच्या आहारात त्याचा समावेश करून किती अविश्वसनीय आरोग्य फायदे आहेत. कढीपत्त्यात आढळणारे अँटीऑक्सिडंट्स आणि इतर पोषक तत्व तुमच्या शरीराला आतून स्वच्छ करतात आणि अनेक आजारांपासून तुमचे रक्षण करतात. कढीपत्त्याचे पाणी नियमितपणे प्यायल्याने तुमची पचनक्रिया सुधारतेच पण वजन कमी होण्यासही मदत होते. ३० दिवस दररोज सकाळी रिकाम्या पोटी कढीपत्त्याचे पाणी पिल्याने तुम्हाला कोणते फायदे मिळू शकतात.

**कढीपत्त्याचे पाणी पिण्याचे फायदे –**

**१.पचनक्रिया सुधारते**

कढीपत्त्यात आढळणारे घटक पाचक एंझाइम सक्रिय करण्यास मदत करतात, ज्यामुळे अन्नाचे पचन सुधारते. यामुळे बद्धकोष्ठता, सिडिटी, गॅस आणि ब्लोटिंग सारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**२. रक्तातील साखर नियंत्रित करते**

कढीपत्त्यात असलेले अँटिऑक्सिडंट्स रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. मधुमेह असणाऱ्या रुग्णांसाठी हे खूप फायदेशीर असते.

**३. हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

कढीपत्त्यात असलेले पोषक तत्व हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो आणि हृदयाशी संबंधित आजारांचा धोकाही कमी होतो.

**४. वजन कमी करण्यास मदत**

कढीपत्त्यात जास्त प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे तुम्हाला दीर्घकाळ भूक लागत नाही. यामुळेच रोज प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत होते.

**५. त्वचेसाठी फायदेशीर**

कढीपत्त्यात अनेक अँटिऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे असतात जी त्वचा निरोगी आणि चमकदार बनविण्यास मदत करतात. तसेच मुरुम, डाग आणि सुरकुत्या कमी होण्यास मदत होते.

**६. केसांसाठी फायदेशीर**

कढीपत्त्यात असलेले पोषक घटकांमुळे केस



मजबूत आणि चमकदार बनण्यास मदत होते. हे केस गळणे थांबवते आणि केस नैसर्गिकरित्या काळे देखील करते.

**७. प्रतिकारशक्ती मजबूत करते**

कढीपत्त्यात अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास आणि अनेक रोगांपासून तुमचे रक्षण करण्यास मदत करते.

कढीपत्त्याचे पाणी कसे बनवायचे?

१. एका भांड्यात १० ते १२ ताजी कढीपत्ता घ्या.

२. त्यांना स्वच्छ पाण्याने चांगले धुवा.

३.ही पाने एक लिटर पाण्यात उकळा.

४. पाणी अर्धवट राहिल्यावर गॅस बंद करा.

५. हे पाणी थोडे थंड करून प्या.

**या गोष्टी लक्षात ठेवा –**

१. कढीपत्ता खाण्यापूर्वी गर्भवती महिला आणि स्तनपान देणाऱ्या महिलांनी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

२. तुम्हाला कोणत्याही प्रकारची ऍलर्जी असल्यास, कढीपत्त्याचा आहारात समावेश करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# गुरुवारी डाक अदालतीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती,** – भारतीय डाक विभागामार्फत गुरूवार, दि. १२ डिसेंबर रोजी डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ही डाक अदालत प्रवर अधीक्षक, डाकघर अमरावती विभाग यांच्या कार्यालयामध्ये दुपारी ४ वाजता होणार आहे.

पोस्टाच्या कामासंबंधी विशेषत: स्पीड पोस्ट, काउंटर सेवा, डाक वस्तू रजिस्टर पार्सल, बचत बँक व मनीऑर्डर अशा तस्सम तक्रारीबाबतचे निराकरण सहा आठवड्याच्या आत झाले नसेल व त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नसेल, अशा तक्रारी विचारात घेऊन डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.डाक अदालतीसाठी सर्व संबंधितांनी आपले अर्ज प्रवर अधीक्षक, डाकघर अमरावती विभाग, अमरावती ४४४ ६०२ यांच्याकडे सादर करावेत. त्यामध्ये तक्रारीचा सर्व तपशील, तक्रार केल्याची तारीख, ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठविली असेल त्याचे नाव आणि हुद्दा आदी उल्लेख करुन दि. १२ डिसेंबरपर्यंत पाठवावेत, असे प्रवर अधीक्षक डाकघर यांनी कळविले आहे.

# कधी पण या, नक्की..!

आपल्या घरी जर कोणी पाहुणे म्हणून आले आणि ते परत जायला निघाले तर जातो मी, असे म्हणण्याची प्रथा नाही. त्याऐवजी येतो मी, असे म्हणण्याची प्रथा आहे. बराय, येतो मी, असे म्हणून आपण एकमेकांचा निरोप घेत असतो. पृथ्वीतलावरून एक्झिट घेतलेला माणूस काही पुन्हा परत येत नसतो, हे मात्र शाश्वत सत्य आहे. एखादा माणूस मी पुन्हा येईन असे म्हटला तर आपल्या संस्कृतीमध्ये या हो, कधी पण या, नक्की या, असे आग्रही निमंत्रण देण्याची प्रथा आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मी पुन्हा येईन या विधानाचे पडसाद गेली पाच वर्षे उमटत राहिले.

युतीची सत्ता निश्चित येणार, हे आत्मविश्वासाने सांगणारे देवाभाऊ मी पुन्हा येईन, असे तीन वेळेला म्हणाले आणि खरे पाहता, ज्या पक्षाबरोबर युती होती त्या पक्षाबरोबर निवडून पण आले. एकदा का निवडून आले की, सोबतीने निवडणूक लढविणार्या पक्षाने भलत्याच पक्षांसोबत असंगाचा संग करून घेतला आणि मी पुन्हा येईन असे म्हणणार्याला त्या मुख्य खुर्चीवर बसता आले नाही. मी पुन्हा येईन या वाक्याची प्रचंड अशी खिल्ली विरोधी पक्षांनी जवळपास पाच वर्षे उडवली. काही बोलभांड प्रवक्त्यांनी ते पुन्हा कधीच येणार नाहीत, अशीही भविष्यवाणी वर्तवली होती. मुख्य खुर्चीवर येण्याऐवजी ते मुख्य विरोधी खुर्चीवर गेल्यामुळे काही लोकांनी ते अर्धेच आले, पूर्ण आले नाहीत, असे म्हटले. शिवाय, गेली अडीच वर्षे भरपूर प्रयत्न केल्यानंतर देवाभाऊंना मुख्य खुर्चीच्या बाजूच्या उपखुर्चीवर बसायला लागले याची पण भरपूर खिल्ली उडविण्यात आली. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये 'न भूतो ना भविष्यती' असा जनादेश देवाभाऊंना मिळाला आणि आपल्या सोबतीच्या पक्षांच्या मदतीने ते मुख्य खुर्चीवर स्थानापन्न झाले.




सत्तेचा आणि राजकारणाचा खेळ फार मजेदार असतो. आपण केलेली कर्मे पुन्हा परत येत असतात, पुन्हा पुन्हा परत येत असतात. या जन्मीचे याच जन्मी फेडावे लागते, हे विरोधकांना आता नीट समजले असावे. मी पुन्हा येईन, असे म्हणणार्या नेत्याचे पुनरागमन विरोधकांना दीर्घकाळ डाचत राहील. दुसरे कोणी आल्यापेक्षा हाच नेता पुन्हा आलेला बरे राहील, असा स्पष्ट जनादेश राज्यातील जनतेने दिलेला आहे, हे निर्विवाद सत्य आहे. पुन्हा येईन या विधानाची खिल्ली उडविलेल्या लोकांची मात्र मोठीच पंचाईत होऊन बसली आहे. आपणास करावयाची कामे त्यांच्याकडेच घेऊन जाणे भाग पडणार आहे. सदर नेता मनामध्ये कोणतीही खुन्नस किंवा राग न ठेवता सर्वांना न्याय देईल, अशी अपेक्षा आहे. सुसंस्कृत महाराष्ट्राचा हा आश्वासक चेहरा राजकीय संस्कृती अधिक समृद्ध करून राज्याला देशपातळीवर क्रमांक एकवर नेईल, ही अपेक्षा बाळगायला हरकत नसावी. मी पुन्हा येईन हे प्रचलित झाले आहे की, प्रत्येकाच्या तोंडी हे शब्द आपणास पाहायला मिळत आहेत. अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही हे वाक्य रुजले आहे; पण कोणीही या पण आपल्या भागाच्या विकासाचा ध्यास घेऊन या, असे लोक आता म्हणत आहेत. प्रत्येक राजकारण्याने विकासाला प्राधान्य द्यावे हीच सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असते आणि तसेच ते भविष्यातही घडो, अशी अपेक्षा बाळगायला हरकत नसावी, हे नक्कीच!

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक


बुधवार दि. ११ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


## ज्यांना 'जय श्रीराम' नाऱ्याचा त्रास होतो, त्यांना पाकिस्तानात रवाना करा; नवनीत राणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती : –** जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांच्या कन्या इल्तिजा मुफ्ती यांनी हिंदुत्व हा एक आजार आहे, असे वक्तव्य नुकतेच केले. या वक्तव्यामुळे इल्तिजा मुफ्ती चर्चेत आल्या आहेत. त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीकाही होते आहे. आता भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी इल्तिजा मुफ्ती यांच्या वक्तव्याचा निषेध करतानाच आणखी एक वादग्रस्त केले आहे. ज्यांना जय श्रीरामच्या नाऱ्याचा त्रास होतो, ज्यांना हिंदुत्वाविषयी द्वेष आहे, त्यांना सरकारने पाकिस्तानात पाठवून द्यावे, असे नवनीत राणा यांनी म्हटले आहे.नवनीत राणा म्हणाल्या, मेहबुबा मुफ्ती यांच्या कन्या इल्तिजा मुफ्ती यांनी हिंदुत्व हा एक आजार आहे, हिंदुत्व आणि हिंदूइझम मध्ये खूप अंतर आहे, असे वक्तव्य केले आहे. आता हिदुस्तानात राहणाऱ्या सर्व हिंदूंना आता हिंदूइझम काय आहे, हे मेहबुबा मुफ्ती यांच्या मुलीकडून शिकावे लागणार आहे. मी केंद्र सरकारला देशातील सर्व हिंदू लोकांच्या वतीने हात जोडून विनंती करते की, ज्यांना जन्म या हिदुस्थानच्या भूमीवर झाला आहे.

त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विषयी द्वेष वाटत असेल, हिंदू आणि हिंदूइझमपासून त्रास होत असेल, जय श्रीराम या नाऱ्याचा त्रास असेल, तर या सर्व लोकांना पाकिस्तानात पाठवावे. कारण हा हिंदुस्तान आहे, या ठिकाणी जय



श्रीरामचे नारे देखील लागतील, हिंदू आपले उत्सव देखील उत्साहाने साजरे करतील. ज्यांना हिंदुस्तानाविषयी द्वेष आहे, ते पाकिस्तानातून जाऊ शकतात.

इल्तिजा मुफ्ती यांनी एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. त्यात त्या म्हणतात, हे सगळे पाहून प्रभू रामही मान झुकवतील. प्रभू रामही हेच म्हणतील की माझे नाव घेऊ नका. या अल्पवयीन मुस्लिम मुलांना फक्त यासाठी मारले जाते आहे की त्यांनी रामाचे नाव घेतले नाही. हिंदुत्व हा एक आजार आहे. या आजाराने लाखो भारतीयांना ग्रासले आहे.

नवनीत राणा यांना लोकसभा निवडणूक काळात भाजपने त्यांना गुजरातमध्ये स्टार प्रचारकही बनवले होते. ५ मे रोजी गुजरातमध्ये प्रचार करताना नवनीत म्हणाल्या की, ज्याला जय श्रीराम म्हणायचे नाही, ते पाकिस्तानात जाऊ शकतात. हा हिंदुस्थान आहे. भारतात राहायचे असेल तर जय श्रीराम म्हणावे लागेल. यावरून त्यांच्यावर टीका झाली होती.

## विभागीय टास्क फोर्स समितीची सभा

## योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावी नियोजन करा- डॉ. निधी पाण्डेय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती**



शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध लोकहितकारी योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावी नियोजन करुन विहित मुदतीत विकासकामे पूर्ण होण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी विभागातील जिल्हा प्रशासनाला दिले.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय टास्क फोर्स समितीची सभा सोमवारी (ता.९ डिसेंबर) संपन्न झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, समाज कल्याण उपायुक्त सुनील वारे, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त सुरेश वानखेडे, कामगार विभागाचे उपायुक्त आदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून तर समितीचे सचिव तथा विकास उपायुक्त राजीव फडके प्रत्यक्षरित्या यावेळी सभेला उपस्थित होते.

डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, गोर-गरीब जनतेला हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल उपलब्ध करुन दिल्या जाते. ग्रामीण व शहरी भागातील एकही पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित विभागांनी त्यांच्याकडील प्रलंबित घरकुलासंदर्भात आढावा घेवून ती पूर्ण होण्यासाठी प्रभावी नियोजन करावे.

भूमिहीन लाभार्थींना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. अतिक्रमण नियमानुकूलची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. नवीन लाभार्थ्यांच्या संदर्भात सर्वेक्षण, घरकुल मंजूरात व पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.या सभेत ग्रामीण भागातील पात्र भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे, अतिक्रमण नियमानुकूल करणे, पंडीत दीनदयाल अर्थसहाय्य योजनेंतर्गत जागा खरेदीसाठी मदत करणे, ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास आदी विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करणे, मंजूर घरकुल पूर्ण करुन घेणे, अनुदान वितरीत करणे, नवीन लाभार्थ्यांसाठी सर्वेक्षण करणे इत्यादी महत्वपूर्ण मुद्दांबाबत आढावा घेण्यात आला आणि त्यानुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. विभागातील एकही पात्र लाभार्थी शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित विभागप्रमुखांनी जबाबदारीपूर्वक उत्तम नियोजन करावे. तसेच योजनेंतर्गत जिल्ह्याला प्राप्त उद्दिष्टपूर्तीसाठी सर्वंकष प्रयत्न करावे, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

## ऊर्जा संवर्धन सप्ताह शनिवारपासून साजरा होणार

## विद्यार्थ्यांद्वारे जनजागृती कार्यक्रम

**दि.११अमरावती,**

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह शनिवार, दि. १४ ते २० डिसेंबर, २०२४ दरम्यान राबविण्यात येणार आहे. या सप्ताहात विद्यार्थ्यांमार्फत ऊर्जा संकट व अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापराविषयी जनजागृती करण्यात येणार आहे,

नवीन व नवीकरणीय ऊर्जा, तसेच ऊर्जा बचतीचे महत्त्व वाढत आहे. आज ६० टक्क्यांपेक्षा जास्त ऊर्जा निर्मिती ही औष्णिक ऊर्जा निर्मिती पद्धतीने केली जाते. तथापि पारंपरिक पद्धतीने ऊर्जा निर्मिती करताना पर्यावरणामध्ये ग्रीन हाऊस गॅसेस सोडले जातात. यामध्ये कार्बन, क्लोराईड, नॉयट्रोजन, सल्फेट यांचा समावेश असतो.

या वायूचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. तसेच जागतिक उष्णतामान वाढत आहे. पारंपरिक ऊर्जा निर्मितीचे स्त्रोत सिमीत आहे. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहामध्ये शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमार्फत ऊर्जा संकटाबाबत जनतेमध्ये जनजागृती, तसेच अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापराविषयी प्रबोधनात्मक संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे, अशी माहिती महाऊर्जाचे विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल तायडे यांनी दिली.

## जेतेपदासाठी मुले, मुलींच्या ५७ संघांत चुरस

### १४ वर्षांखालील राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेला सुरुवात, जि.प.सीईओंच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती –**

विभागीय क्रीडा संकुलातील इनडोअर स्टेडियममध्ये ६८ व्या १४ वर्षांखालील राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेत मंगळवारी सकाळी ९ वाजतापासूनच जेतेपदासाठी मुलांच्या ३० तर मुलींच्या २७ अशा एकूण २७ संघांमध्ये चुरस सुरू झाली.

या स्पर्धेत देशातील विविध राज्य व केंद्रशासित प्रदेशातील एक हजारावर खेळाडू, प्रशिक्षक, पंच सहभागी झाले आहेत. क्रीडा उपसंचालक कार्यालयाच्या यजमानपदाखाली तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि भारतीय शालेय क्रीडा महासंघाद्वारे या स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेचे उद्घाटन सायंकाळी ५



वाजता जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या हस्ते झाले. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर राजेंद्र गोगले, सहायक आरटीओ कांचन जाधव, विदर्भ हौशी कबड्डी संघटनेचे सचिव जितू ठाकूर, एसजीएफआय पर्यवेक्षक तृप्ती अग्रवाल, सिनेट सदस्य डॉ. सुभाष गावंडे, शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते डॉ. नितीन चवाळे, उद्योगपती नवीन खंडूजा उपस्थित होते.

क्रीडा उपसंचालक विजय संतान यांनी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेबाबत माहिती दिली. तर उद्घाटक मोहपात्र यांनी खेळाडूंनी खेळ भावनेने खेळत स्पर्धेचा आनंद घेण्याची सूचना केली. सोबतच स्पर्धेच्या उद्घाटनाची घोषणा केली.

मुला-मुलींचे सामने असे मुलांच्या गटात दादरा नगर हवेलीविरुद्ध छत्तीसगडने ३९ गुणांनी विजय मिळवला. कर्नाटकने पाँडिचेरीविरुद्ध ४४ गुणांनी, गुजरातने पश्चिम बंगालला रोमांचक लढतीमध्ये एका गुणाने मात दिली. तेलंगणाने ओडिशाचा २५, राजस्थानने जम्मू काश्मीरचा ३९, हरियाणाने हिमाचल प्रदेशचा ३४ गुणांनी पाडाव केला. मुलींच्या गटात हरियाणाने छत्तीसगडचा ८ गुणांनी, दिल्लीने राजस्थानचा ८ गुणांनी, आंध्र प्रदेशने जम्मू काश्मीरचा १३ गुणांनी, तामिळनाडूने पश्चिम बंगालचा २७ गुणांनी पराभव केला.

## जिल्ह्यात ३०० शिक्षक,१०१ केंद्रप्रमुख अन् २५ विस्तार अधिकाऱ्यांची पदे रिक्त

### काही शाळांमध्ये एकाच शिक्षकाकडे दोन ते तीन वर्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती –** जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला अक्षरश: घरघर लागली आहे. या विभागात शिक्षणाधिकाऱ्यापासून ते शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. ताज्या आकडेवारीनुसार ३०० शिक्षक, १०१ केंद्रप्रमुख, २५ विस्तार अधिकारी, नऊ गटशिक्षणाधिकारी आणि एका शिक्षणाधिकाऱ्याचे पद रिक्त आहे.

येथील प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार योजना विभागाचे शिक्षणाधिकारी अरविंद माहोरे यांच्याकडे सोपवला आहे. पूर्वी बुद्धभूषण सोनोने हे उपशिक्षणाधिकारी या पदाचा कार्यभार सांभाळत होते. त्यामुळे उपशिक्षणाधिकाऱ्याचीह ी दोन पदे रिक्त आहेत. एकाचा पदभार भातकुली पं. स.चे गटशिक्षणाधिकारी दीपक कोकतरे यांच्याकडे



सोपवला आहे. जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची संख्या १४ असल्यामुळे जिल्ह्याला तेवढेच गटशिक्षणाधिकारी हवे आहेत. परंतु त्यापैकी पाचच पदे भरली असून उर्वरित सर्व रिक्त आहेत. त्यामुळे तेथेही प्रभारीराज आहे. काही ठिकाणी शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना तर कोठे वरिष्ठ केंद्र प्रमुखांना या पदाची कामे करावी लागत आहेत. ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची ३७ पदे मंजूर असून, १७ जणच कार्यरत आहेत. २० पदे रिक्त आहेत. कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांची २० पदे मंजूर असून, ५ पदे रिक्त आहेत. या पदाचा अतिरिक्त पदभार कुठे केंद्र प्रमुखांकडे तर कुठे पात्र मुख्याध्यापकांकडे सोपवला आहे. जिल्ह्यात केंद्र प्रमुखांची १४० पदे मंजूर असून पदोन्नतीची ३१ पदे तर सरळ सेवेची ७० पदे रिक्त आहेत. पात्र मुख्याध्यापक आणि विषय शिक्षक, सहायक शिक्षक यांची ३०० पदे रिक्त आहेत. त्यामुळे काही दोन शिक्षकी शाळा एक शिक्षकी झाल्या असून, काही शाळांमध्ये एकाच शिक्षकाकडे दोन ते तीन वर्ग देण्यात आले आहेत. त्यातही त्यांच्याकडे बरीचशी अशैक्षणिक ऑनलाइन कामे देण्यात आल्याने विद्यादान प्रभावित झाले आहे.

> विद्यार्थ्यांचे शिक्षण अडचणीत येणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. प्रतिनियुक्ती व इतर उपाय अंमलात आणले आहेत.
>
> **संजीता महापात्र, सीईओ, जि. प.**

## बांग्लादेशातील हिंदूवरील अत्याचार थांबवा - प्रविण पोटे पाटील

### हजारो नागरिक अत्याचार विरोधी निषेध मोर्च्यात सहभागी झाले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती**

बांगला देशातील हिंदू, अल्पसंख्यांक जैन, बौद्ध, शीख यांच्यावर होत असलेले भ्याडहल्ले, हत्या, आणि हिंसाचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. हिंदू, शीख, जैन , बौद्ध समाजाच्या मालमत्तेची लुटमार आणि महिलांवरील अत्याचार अशा घटना गंभीर आणि चिंताजनक बनल्या आहेत. या सुनियोजित हल्लयांमुळे बांग्लादेशातील जीवन असुरक्षित झाले आहे.तसेच या अत्याचारांचा कायदेशीरपणे विरोध करणाऱ्या इस्कॉनचे प्रमुख स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांना देशद्रोहाच्या खोट्या आरोपांखाली अटक करण्यात आली आहे.ही घटना बांगलादेशातील हिंदूंचा आवाज दडपण्याचा प्रयत्न आहे. बांगलादेशात हिंदू , शीख, जैन, बौद्ध समाजावर होणाऱ्या अत्याचार विरोधात सकळ हिंदू समाज व भारतीय जनता पार्टी अमरावती शहर तर्फे प्रविण पोटे पाटील यांच्या नेतृत्वात अमरावती येथे निषेध मोर्चा संपन्न झाला, यात अमरावती शहरातील सकल हिंदू,



शीख, बौद्ध,जैन समाजातील हजारो लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

बांगला देशातील हिंदूवरील अत्याचाराच्या घटना वाढत आहे यात हिंदू शीख , बौद्ध जैन समाजातील महिलावर अत्याचार, हत्या, संपत्ती लूट वर बांगलादेश सरकार कठोर कारवाई करत नाही तसेच इस्कॉन मंदिराचे प.पू.श्री स्वामी चिन्मय कृष्णदासजी महाराज यांना विनाकारण कारावासात डांबून ठेवण्याच्या विरोधात आज सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित निषेध मोर्चा मध्ये बांगलादेश सरकार चा निषेध करत असून बांगला देशातील हिंदूवरील अत्याचार थांबवावे असे प्रतिपादन भाजप अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले.

## निवडणुकीच्या प्रशासकीय खर्चाचा हिशेब जुळवणे सुरु:२० कोटीचा अंदाज

## निवडणूक अधिकाऱ्यांचे आठही आरओंना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रशासकीय खर्चाचा हिशेब जुळविण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यासाठी जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदार संघांच्या निवडणूक अधिकाऱ्यांना (आरओ) पत्रं पाठविण्यात आली असून खर्चाची आकडेवारी मागविण्यात आली आहे. एका अंदाजानुसार या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाला सुमारे २० कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च करावी लागली.

गेल्या २० नोव्हेंबरला विधानसभेच्या निवडणुकीसाठीचे मतदान पार पडले. त्यानंतर २३ तारखेला निकालाअंती आठही आमदारांच्या विजयाची घोषणा करण्यात आली. या निवडणुकीसाठी जिल्हाभरात सुमारे १५ हजाराहून अधिक अधिकारी, कर्मचारी काम करीत होते. यामध्ये निवडणूक अधिकाऱ्यांपासून ते मतदान केंद्राध्यक्ष, मतदान आणि मतमोजणी अधिकारी तसेच कर्मचारी, पोलिस आणि इतर कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या सर्वांचे वेतन आणि भत्ते, निवडणूक काळातील त्यांच्या प्रशिक्षणावर झालेला खर्च, जेवणावळींचा खर्च, वाहनांचे भाडे, मतमोजणी केंद्रासाठी वापरलेल्या इमारतींचे भाडे, निवडणुकीसाठीच्या वेगवेगळ्या कागदपत्रांची छपाई, व्हीडीओ व फोटोग्राफी, स्वीप उपक्रमासाठी तयार करण्यात आलेली पथनाट्ये, मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तयार करण्यात आलेले बॅनर, पोस्टर तसेच फिरत्या वाहनांवरील डिजीटल फ्लेक्स असा सर्व बाबींचा यामध्ये समावेश आहे.




सूत्रांच्या मते निवडणुकीचा [illegible] ची खर्च [illegible]

> **सारे काही उधारीतच**
>
> निवडणुकीचा बहुतेक खर्च हा उधारितच केला जातो. वेगवेगळ्या कामांचे कंत्राट घेणाऱ्यांनाही त्याची माहिती असते. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया आटोपल्यानंतर बील तयार करून ते निवडणूक अधिकाऱ्यांकडे पाठविणे आणि त्यांच्यामार्फतच पुढे जाऊन रक्कम मागवणे, हीच नेहमीची पद्धत आहे.

होण्याआधीपासून तयार केली जाणारी मतदार यादी ते मतमोजणीपर्यंत पूर्ण कराव्या लागणाऱ्या विविध टप्प्यांवर झालेला एकूण खर्च असतो. हा खर्च प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा वेगवेगळा असतो. तेथील निवडणूक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात तो केला जातो. त्यामुळे त्या-त्या निवडणूक अधिकाऱ्यांकडून तो मागविण्यात आला आहे. साधारणत: ४५ दिवसांच्या आंत ही संपूर्ण मोजदाद केली जाते. त्यानंतर तो निवडणूक आयोगाकडे पाठवून तेवढ्या रकमेची मागणी केली जाते.

# बांगलादेशातील हिंदूंच्या रक्षणासाठी जिल्ह्यात विविध हिंदू संघटना उतरल्या रस्त्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती –**
बांगलादेशात हिंदूंवर सुरू असलेल्या अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ शहरात मंगळवारी सकल हिंदू समाजातर्फे निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात २ हजारांवर हिंदू संघटनांचे पदाधिकारी, नागरिक, भाजप पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. इस्कॉनचे संत चिन्मय कृष्ण प्रभू दास यांना बांगलादेशात केलेली अटक, हिंदूंवर होणारे अत्याचार व सुरक्षेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी हजारोंच्या संख्येत संपूर्ण अमरावती जिल्ह्यात नागरिक रस्त्यावर उतरले होते.

संतांनी व उपस्थित मान्यवरांनी जयस्तंभ चौकातील महात्मा गांधीच्या पुतळ्याला हारार्पण करून निषेध मोर्चाला सुरुवात केली. ही रॅली जयस्तंभ चौकातून सरोज चौक मार्गे श्याम चौकातून राजकमल चौकात आली. राजकमल चौकात उपस्थित प्रचंड जनसमुदायाला प्रमुख वक्त्यानी संबोधित केले.

निषेध मोर्चाला जनतेने हजारोंच्या संख्येने प्रतिसाद दिल्याने शहरात हिंदू एकतेची शक्ती दिसून आली. शहरातील हिंदुत्ववादी वातावरण बघता सकल हिंदू समाज बांगलादेशी हिंदूंच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. दरम्यान एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या अनुपस्थित तहसीलदार नीलेश खटके यांना सोपवले. संदीप मुनी जैन महंत, संत राजेशलाल साहेब, नित्य हरिनाम प्रभुजी इस्कॉन, ज्ञानेश्वर

## पदाधिकारी, नागरिक, माजी नगरसेवकांचा सहभाग



महाराज पातशे तसेच विश्व हिंदू परिषदेचे विभाग संघटनमंत्री बंटी पारवानी या वेळी उपस्थित होते. मुख्य वक्ता म्हणून धरमपेठ महाविद्यालयातील इतिहासाचे प्रा. डॉ. सतीश चाफले, विविध प्राधिकरणावरील सदस्य उपस्थित होते. हजारो वर्षांच्या हल्ल्यानंतरही हिंदू संघर्ष करत राहिला. परंतु, आज बांगलादेशात हिंदूंच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे हिंदू रस्त्यावर उतरला आहे. बांगलादेशी सरकारने कट्टरपंथी लोकांना थांबवावे अन्यथा हिंदू समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा निर्वाणीचा इशारा यावेळी देण्यात आला.

बंटी पारवानी यांनी बांगलादेशातील हिंदू समाजाची व्यथा अमरावतीकरांसमोर मांडली. तसेच बांगलादेशातील हिंदू, जैन, शीख, बौद्ध व इतर सर्व अल्पसंख्याक नागरिकांना न्याय मिळवून देण्याची सरकारला विनंती केली. मोर्चात माजी खासदार नवनीत राणा, आ. प्रताप अडसड, तुषार भारतीय, भाजप प्रदेश सचिव जयंत डेहनकर, शिवसेना उबाठाचे सुनील खराटे, प्रा. दिनेश सूर्यवंशी, हरे रामा हरे कृष्णा ग्रुप, शहरातील सर्व हिंदू संघटनांचे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच नागरिक बांगलादेश येथील हिंदूंना समर्थन देण्यासाठी उपस्थित होते. मोर्चात लहान बालकांसह तर ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांचीच उपस्थिती राहिली. आईसह आलेला बालक बघून माजी खा. नवनीत राणा यांच्यासह सर्वांना आश्चर्य वाटत होते. हरे रामा हरे कृष्णाचा गजर, केशरी दुपट्टे, हिंदू एक आहेत, अशा घोषणांचे फलक हाती घेत शहरातील विविध राजकीय, सामजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक तसेच विविध महिला संघटनांचे नेते व कार्यकर्तेदेखील लक्षणीय संख्येने उपस्थित होती.

# १५१ संस्थांच्या निवडणुकीची लगबग८८ संस्थांमध्ये प्रक्रिया

## ६३ संस्थांना आदेशाची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :**
जिल्ह्यात सहकार विभाग अंतर्गत १५१ संस्थांचा कार्यकाळ डिसेंबर महिन्यात संपुष्टात येत आहे. या संस्थांची निवडणूक लवकरच जाहीर होणार आहे. यापैकी 'ड' वर्गीय सहकारी संस्थांची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, ६३ संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाच्या पत्राची प्रतीक्षा आहे.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या मार्गदर्शनात सहकार विभागाद्वारा 'ड' वर्गीय ८८ संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू केली आहे. यात मजूर सहकारी संस्था, बेरोजगारांच्या संस्था, पाणी वापर संस्था, औद्योगिक कामगार संस्था यासह अनेक लहान सहकारी संस्थांचा समावेश आहे. याशिवाय पतसंस्था, सहकार सोसायटीसारख्या ३७ 'ब'वर्गीय सहकारी संस्था व १० लाखांच्या वर व्यवहार असणाऱ्या 'क' वर्गीय सहकारी संस्थांच्या निवडणूक अद्याप प्रलंबित आहेत. यासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयास राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे आदेशाची प्रतीक्षा आहे.

### डिसेंबरअखेर प्राधिकरणाचे आदेश

प्राधिकरणाद्वारा ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्यामुळे ६६ सहकारी संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता आता संपुष्टात आलेली आहे. मात्र, मुदतवाढीचा कालावधी बाकी आहे. त्यामुळे डिसेंबरअखेर राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण द्वारा याबाबतचे पत्र देण्यात येणार असल्याची सहकार विभागाची माहिती आहे.

# कृषी क्रांती व कृषी स्वावलंबन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दि.११अकोला,–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना यासाठीजिल्ह्यातील सर्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज महाडीबीटी प्रणालीवर करून या योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शंकर सो. किरवे यांनी केले आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पिक या (सूक्ष्म सिंचन) योजना सन २०२४–२५ अंतर्गत सुक्ष्म सिंचन घटकाची सोडत लवकरच होणार आहे, सोडतीमध्ये निवड होऊन लाभ देण्यात आलेल्या अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत आणि क्षेत्राबाहेरील) अंतर्गत पुरक अनुदान देय असल्याने अशा प्रकारे दोन्ही योजनामधुन पात्र शेतक–यांना मंजुर मापदंडाच्या ९० टक्के च्या मयदित अनुदान देण्यात येते. अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीतील अल्प व अत्यल्प भुधारक लाभार्थ्यांना अनुक्रमे २५ टक्के आणि इतर शेतक–यांना ३० टक्के पुरक अनुदान मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतुन अदा करण्यात यईल.

# दुचाकींची समोरासमोर धडक; दोन ठार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :**
भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक होऊन घडलेल्या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एक वृद्धा गंभीर जखमी झाली. ही घटना मंगळवार, १० डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धारणी मार्गावरील श्रीकृष्ण मंदिराजवळ घडली.

गजानन शनवारे (३५) रा. घाटलाडकी, चांदूरबाजार व अजय जामूनकर (३०) रा. भुलोरी, चिखलदरा अशी मृतकांची नावे आहेत. या अपघातात गंभीर झालेल्या वृद्धेला परतवाडा येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गजानन शनवारे हे दुचाकी क्रमांक एमएच २७ बीए ७८४९ ने वृद्धेसह चिखलदरा तालुक्यातील मुसंडी येथे नातेवाइकाच्या अंत्यविधीसाठी जात होते.

त्याचवेळी अजय जामूनकर हे दुचाकी क्रमांक एमएच २७ डीएफ ०१३६ ने विरुद्ध दिशेने जात होते. मार्गात श्रीकृष्ण मंदिराजवळ दोघांच्याही दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या अपघातात गजानन शनवारे व अजय जामूनकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर वृद्धा गंभीर जखमी झाली. अपघाताची माहिती मिळताच परतवाडा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेहांना शवविच्छेदनासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# 'मॅट'च्या इतिहासात प्रथमच लोक अदालत,१२६ जणांना नोकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ नागपूर १३**
नागपूर : महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षांत प्रथमच लोकअदालत घेण्यात आली. त्यात ५४२ सेवाविषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोक अदालतीमध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये मुंबई खंडपीठाच्या– २३८ प्रकरणांपैकी ३९ तर नागपूर– खंडपीठाच्या १५० पैकी ६३ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणांचा समावेश आहे.

न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुर्हेकर, आर. बी. मलिक यांनी



काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर.एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अनेक वर्षे प्रलंबित प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली.लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषी विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाहीत. त्यामुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरित रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे.

# जिल्हास्तरावर आता आदर्श कर्मचारी पुरस्कार पहिल्या पुरस्काराचे१६ डिसेंबर ला होणार वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती–** आदर्श शिक्षक, आदर्श ग्रामसेवक पुरस्काराच्या धर्तीवर आता आदर्श कर्मचार्यांचाही पुरस्कार देवुन गौरव होणार आहे. जिल्हा परिषदेत सीईओ संजिता महापात्र याच्या संकल्पनेत पहील्यांदाच या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ३० कर्मचार्यांची पुरस्काराकरीता निवड करून त्यांना दरवर्षी संविधानदिनी २६ नोव्हेंबरला सन्मानित करण्यात येणार अहे. यावर्षीचा आदर्श पुरस्कार १६ डिसेंबरला दिल्या जाणार असून




याकरीता सामान्य प्रशासन विभागाकडे अर्ज प्राप्त होत आहे. जिल्हा परिषदेचे शिक्षक,ग्रामसेवक व कर्मचार्यांना शासनाकडून राज्यस्तरावर पुरस्कार दिल्या जात असताना जिल्हास्तरावर यातील शिक्षक, ग्रामसेवकांना या व्यतिरिक्त आदर्श पुरस्कार दिल्या जातो. याच धर्तीवर उत्कृष्ट काम करणार्या कर्मचार्याचाही सन्मान व्हावा याकरीता त्यांना देखील जिल्हास्तरावर यंदापासुन ३० आदर्श कर्मचार्यांना पुरस्कार देण्याचा निर्णय सीईओ संजिता महापात्र यांनी घेतला आहे. याकरीता सात सदस्यीस समितीचे गठण करण्यात आले आहे.या समितीमध्ये सीईओ अध्यक्ष राहणार असुन अतिरिक्त सीईओ हे उपाध्यक्ष म्हणुन काम पाहणार आहे. याशिवाय सदस्य म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकारी, बांधकामचे कार्यकारी अभियंता, जिल्हा आरोग्य अधिकारी, महीला बाल कल्याण विभाग व सामन्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. दरवर्षी २६ नोव्हेंबरला पुरस्काराचे वितरण होणार असुन तत्पुर्वी कर्मचार्यांचे प्रस्ताव स्विकारल्या जाणार आहे.

### 'या' विभागातील ३० कर्मचार्यांची होणार निवड

जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी ३० कर्मचार्यांची पुरस्काराकरीता निवड केली जाणार आहे. यामध्ये १४ पंचायत समितीस्तरावर १४ कर्मचारी, मुख्यालयामधील सामान्य प्रशासन विभागातील ३ कर्मचारी, बांधकाम विभाग २, आरोग्य ३, महीला बालकल्याण १, वित्त १, कृषी १, पशुसंवर्धन विभाग १, ग्रामिण पाणी पुरवठा १, सिंचन १ व शिक्षण विभागातील एका कर्मचार्याची आदर्श पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे.

# जिल्ह्यातील 'जिनिंग' उद्योगाला फटका, पाच हजारांवर हात बेकार

## क्षमतेच्या २५ टक्के काम, कापसाची आवक थांबल्याने ६० वर युनिटला घरघर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**
कॉटन बेल्ट म्हणून ओळख असलेल्या जिल्ह्यात दरवाढीच्या प्रतीक्षेत शेतकरी कापसाची साठवणूक करीत आहेत. त्यामुळे खुल्या बाजारात आवक थांबल्याचा थेट फटका ६० पेक्षा अधिक जिनिंग प्रेसिंगच्या युनिटला बसला. या सर्व युनिटमध्ये क्षमतेच्या २५ टक्केच काम होत आहे. त्यामुळे किमान पाच हजार कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे.

सरासरीपेक्षा जास्त पावसाने कपाशीचे मोठे नुकसान झाले, शिवाय बोंडअळी, बॉडसड व आता लाल्याने दोन ते तीन वेच्यात उलंगवाडी होईल. त्यात खुल्या बाजारात कापसाला ७२०० व सीसीआयमध्ये ७४५० रुपयांदरम्यान भाव मिळत आहे.वेचणीचे दर १० किलोच्या वर पोहोचले आहेत. शिवाय पेरणी ते वेचणीदरम्यान वाढलेल्या प्रचंड उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा बाजारभाव भाव अत्यल्प आहे. त्यामुळे दरवाढीच्या प्रतीक्षेत शेतकऱ्यांचा कल साठवणुकीकडे असल्याचे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर बाजारातील कापसाची आवक जवळपास बंद झालेली आहे. अशा परिस्थितीत जिल्ह्यातील ६० वर जिनिंग उद्योग संकटात आले आहेत. बहुतांश जिनिंग उद्योग दर्यापूर, अंजनगाव, वरुड व अमरावती भागात आहेत. सद्यस्थितीत कापूसच उपलब्ध नसल्याने या युनिटमध्ये क्षमतेच्या फक्त २५ टक्केच काम होत आहे. त्यामुळे या उद्योगात असलेल्या कामगारांपैकी ८० टक्के कामगारांवर आता दुसरे काम शोधण्याची वेळ आली आहे.

### ब्राझिलमध्ये कापसाचे बंपर उत्पादन

देशांतर्गत या वर्षी सरासरी उत्पादनात कमी आलेले आहे. त्या तुलनेत प्रमुख कापूस उत्पादक देश असलेल्या ब्राझिलमध्ये कापसाचे बंपर उत्पादन झालेले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाची डिमांड कमी झालेली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात इतर निर्यातदार देशांच्या तुलनेत भारताचे दर जास्त असल्यानेही मागणीत कमी आल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले.




### चार दिवस एक शिफ्ट, तीन दिवस बंद

जिल्ह्यातील बहुतेक युनिटमध्ये कापसाची अत्यल्प आवक आहे. त्यामुळे आठवड्यात चार दिवस एका शिफ्टमध्ये काम व तीन दिवस जिनिंग बंद राहत असल्याने कामगार कपात झाली आहे. सीसीआयच्या केंद्रांतही फारशी आवक नसल्याचे दिसून येते. आवक कमी झाल्याचा सर्वांना फटका बसल्याचे पनपालिया म्हणाले.

# यवतमाळ हिट अँड रन प्रकरण

## कारने भाजी विक्रेते व दुचाकीस्वारांना उडविले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११यवतमाळ**

यवतमाळ येथील आर्णी रोडवर कृषी नगरजवळ एका भरधाव कारचालकाने पादचाऱ्यांसह दुचाकी स्वार व हात गाडीवाल्यांना उडविले. यात दोन जण गंभीर जखमी झाले असून, पाच ते सहा लोक जखमी झाले. ही घटना मंगळवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास घडली. अक्षय उमरे (२०), दिलीप दारूटकर (४५) दोघेही रा. पुष्पकुंज सोसायटी,यवतमाळ अशी जखमीची नावे आहेत. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यातील अक्षयची प्रकृती गंभीर आहे. तर दिलीप यांच्या डोक्याला मार लागला असून पाय फ्रॅक्चर आहे.

विजय किसन चव्हाण (३०), रा. वाघाडी हा कार ( क्र. एमएच ४२, एएफ १००८) ने आर्णी मार्गाने वडगावकडे जात असताना कृषी नगर गेटजवळ त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडी पदपथावर गेली. पद पथावर भाजी विकणाऱ्या हातगाड्यांना , दुचाकींना व वाहनचालकांना चिरडत पुढे गेली. या गाडीने पाच भाजी विक्रेत्यांच्या हातगाड्यांना व तीन ते चार दुचाकीस्वरांना उडवले. ही धडक इतकी भीषण होती की रस्त्यावर भाजीपाला, दुचाकी आणि जखमी माणसं इतरत्र पडले होते. एका खांबाला धडकून ही कार थांबली. नागरिकांनी वाहनचालकाला गाडीबाहेर काढून चोप दिला. वाहनचालक विजय चव्हाण हा मद्य प्राशन करून होता.नागरिकांनी अपघातस्थळी धाव घेत जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल केले. अवधूतवाडी पोलीस, वाहतूक शाखा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली. कारच्या चालकास नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानंतर कारची तोडफोड केली. यवतमाळ या पद्धतीचा प्रकार पहिल्यांदाच घडला आहे. यासाठी वाहतूक पोलिसांचे व नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

# चिखलदरा @६ अंश सेल्सिअस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११चिखलदरा**

आठवड्याभरानंतर ढगाळ वातावरण हटल्याने रविवारपासून कडाक्याची थंडी पडू लागली आहे. तापमानात घट झाली असून, मंगळवारी पहाटे ५ वाजता विदर्भाचे नंदनवन चिखलदरा पर्यटनस्थळाचा पारा ६ अंश सेल्सिअसपर्यंत कोसळला होता. तर, ७ वाजता ८ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान होते. त्यामुळे संपूर्ण परिसर पूर्णतः गारठला आहे.

आठवड्याभरानंतर थंडीने पुन्हा कमबॅक केले आहे. तापमान पाच ते सहा अंशांनी घटले आहे. फॅंगल चक्रीवादळामुळे कडाक्याची थंडी पडत असताना अचानक थंडीमुळे गारठलेला परिसर सामान्य तापमानावर आला होता.शनिवार, रविवारपासून पुन्हा कडाक्याची थंडी पडू लागली आहे. दिवसरात्र गरम कपडे व शेकोटीजवळ बसून थंडीपासून मेळघाटातील आदिवासी बांधवांना स्वतःची संरक्षण करावे लागत असल्याचे चित्र आहे.विदर्भाचे नंदनवनात विकासकामावर कोट्यवधीचा खर्च होत आहे. पण, येथील एका खासगी महाविद्यालयातील जुन्या यंत्रावर तापमान नोंदीसाठी अवलंबून राहावे लागते. प्रशासकीय स्तरावर नगरपालिका, तहसील कार्यालय किवा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत या थंड हवेच्या ठिकाणी आधुनिक संगणकीय तापमान यंत्र बसविणे गरजेचे आहे.

### थंडीत अनुभवण्यासाठी येतात पर्यटक

चिखलदरा येथील पर्यटनस्थळासह मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सेमाडोह, कोलकास येथील जंगल सफारी, हत्ती सफारीसाठी येणार्या पर्यटकांची संख्या कडाक्याच्या थंडीत वाढली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला भेट देणारे पर्यटक मुसळधार पावसात आणि थंडीत सारख्याच संख्येने येत असल्याचे चित्र आहे. त्याला कारणीभूत येथील शुद्ध, स्वच्छ पर्यावरण आहे.

# मराठी शाळेतील मोफत शिक्षणाकडे पालकांची पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

इंग्रजी शाळांचा खर्च पाहता मराठी शाळेतील मोफत शिक्षणाकडे पालकांची पाठ फिरविल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येते. शिक्षण घेणे हा प्रत्येक बालकांचा हक्क आहे. यासाठीच राज्य शासनाने ग्रामीण व दुर्बल भागातील शिक्षण बाह्य विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले पाहिजे, यासाठी विविध उपक्रम राबवीत आहे.



शासनाच्या वतीने इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते. मात्र, या आधुनिक स्पर्धात्मक युगात गावापासून काही अंतरावर असलेल्या शहरात व मोठ्या गावातील इंग्रजी माध्यमाच्या कान्व्हेंट इंग्रजी शाळांमध्ये महागडे शुल्क भरून आपल्या मुला-मुलींना शिकवणीच्या प्रयत्न सध्याचे पालक करीत आहेत.केवळ एक फॅशन व स्पर्धा म्हणूनकरावी लागते. परिणामी परिसरात अनेक पालक कर्जबाजारी होऊन इंग्रजी शाळेच्या खर्च पूर्ण करीत असल्याचे वास्तव दिसून येत आहे. त्याचे कारण म्हणजे ग्रामीण भागातील इंग्रजी शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांच्या अभाव असल्यामुळे शिस्तीच्या नावाखाली आणि आपल्या गावापासून शाळेपर्यंत येणे-जाणे करण्यासाठी बसची सुविधा आहे. असा भंकसपाजपणा यामुळे इंग्रजी शाळाचे पेव फुटले.ऐपत नसतानाही पालकांनी मोफत शिक्षणाकडे पाठ फिरवली आहे. दुसरीकडे खाजगी शाळेच्या इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव वाढला आहे. मराठी शाळेतून विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने मोफत शिक्षण दिले जाते. मात्र, काही पालक याकडे दुर्लक्ष करून ऐपत नसतानाही महागड्या इंग्रजी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे नाव दाखल करून घेतात. मात्र, नंतर गरीब सामान्य पालकांना इंग्रजी शाळेचा खर्च पेलवत नसल्याने त्यांना तारेवरची कसरतएखाद्या दोन शाळा सोडल्या, तर दर्जा आहे किंवा सर्व इंग्रजी शाळांमध्ये मात्र थातूरमातूरपणे कारभार असला तरीही शहरासह ग्रामीण भागातील पालकांच्याही शहरातील इंग्रजी शाळेवर व आपल्या पालकांचा आपल्या कल्याणला चांगला शिक्षण देण्यावरही भर जास्त वाढला आहे.

# अमरावती परिमंडळाचे तत्पर सेवेसाठी प्रयत्न

## ट्रान्सफॉर्मर जळाला तर महावितरणला कळवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

रब्बी हंगामात शेतीला सुरळीत वीज पुरवठा देण्यासाठी महावितरण प्रयत्नशील आहे. परंतू काही कारणास्तव ट्रान्सफॉर्मर बिघडला असेल आणि महावितरणला ट्रान्सफॉर्मर बिघडल्याची खबर मिळाल्यानंतर कमाल तीन दिवसात ट्रान्सफॉर्मर बदलण्यात येत आहे. तथापि, ट्रान्सफॉर्मर जळाला आहे, हेच उशीराने समजले तर प्रत्यक्षात वीज पुरवठा पुन्हा सुरू होण्यास अधिक विलंब लागतो याची जाणीव ठेवून महावितरणने तत्पर सेवेसाठी एक पाऊल पुढे करत स्थानिक शेतकऱ्यांनी ट्रान्सफॉर्मर नादुरूस्त झाल्याची माहिती महावितरणला कळविण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले आहे.त्यासाठी




महावितरणकडून अमरावती जिल्ह्यातील ग्राहकांसाठी जिल्हा पातळीवर कार्यरत असलेल्या कंट्रोल रूमचा ७८७५७६३८७३ हा मोबाईल नंबर उपलब्ध करून देण्यात आला आहे.महावितरणने उपलब्ध करून देण्यात आलेल्या कंट्रोल रूमशी काही कारणास्तव संपर्क होत नसल्यास जिल्ह्यातील ग्राहकांनी कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांना ७८७५७६३०१८ या क्रमांकावर खबर देता येईल. त्यासोबत या व्हॉट्स प नंबरवर जळालेल्या ट्रान्सफॉर्मरचा फोटो आणि ठिकाणाचा तपशील कळविता येईल.गावातील ट्रान्सफॉर्मर जळाला तर विद्युत पुरवठा खंडित होऊन गावकऱ्यांची गैरसोय होते. जळालेल्या ट्रान्सफॉर्मरच्या जागी दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी महावितरणने सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. त्यासाठी ट्रान्सफॉर्मर ऑईल तातडीने उपलब्ध करणे, दुरुस्त ट्रान्सफॉर्मरचा साठा तयार करणे असे विविध उपाय केले आहेत. ट्रान्सफॉर्मर बदलणे व दुरुस्त करणे याचा आढावा मुख्यालय स्तरावर दररोज घेण्यात येतो. या मोहिमेला यश आले असून महावितरणला ट्रान्सफॉर्मर बिघडल्याची खबर मिळाल्यानंतर कमाल तीन दिवसात ट्रान्सफॉर्मर बदलण्यात येत आहे. तथापि, ट्रान्सफॉर्मर जळाला आहे, हेच उशीराने समजले तर प्रत्यक्षात वीज पुरवठा पुन्हा सुरू होण्यास अधिक विलंब लागत असल्याची समस्या जाणवत आहे. यावर मात करण्यासाठी वीज ग्राहकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.जळालेल्या ट्रान्सफॉर्मरच्या जागी दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसवून लवकरात लवकर वीज पुरवठा पुन्हा सुरू करण्याच्या महावितरणच्या मोहीमेस वीज ग्राहकांनी सहकार्य करावे आणि ट्रान्सफॉर्मर बिघडल्याची खबर तत्पर द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# धारणीच्या उपजिल्हा रुग्णालयात हजार बॉटल क्षमतेची नवी रक्तपेढी

## आधी रक्तासाठी जावे लागत होते १५० किलोमीटर दूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११धारणी**

मेळघाट या आदिवासीबहुल परिसरातील धारणीच्या उपजिल्हा रुग्णालयात हजार बॉटल क्षमतेची नवी रक्तपेढी सुरु करण्यात आली आहे. रक्तपेढी नसल्याने तेथे दाखल होणाऱ्या रुग्णांना बराच त्रास सहन करावा लागत होता. रक्तपेढी तयार झाल्यामुळे हा त्रास टळणार आहे.

ही रक्तपेढी मंजूर करुन घेण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी गेल्या अनेक दिवसांपासून शासनाच्या विविध विभागांसोबत पत्रव्यवहार सुरु केला होता. त्या पत्रव्यवहाराला



आता मूर्त रुप प्राप्त झाले आहे. सदर रक्तपेढीचे प्रमुख म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. अमीत क्षार यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या मदतीला आणखी एक वैद्यकीय अधिकारी डॉ. सुभाष जांभेकर, परिचारिका प्रियंका परदेशी, तांत्रिक पर्यवेक्षक अविनाश जाधव, तंत्रज्ञ आकाश वाघमारे, ज्ञानेश्वरी बोबडे व सायली सोमकुंवर ही चमू देण्यात आली आहे.

मेळघाटात प्रसुतीदरम्यान व इतर चिकित्सेच्या वेळी रुग्णांना रक्ताची गरज भासते. ही गरज भागविण्यासाठी त्या भागात रक्तदातेही आहेत. परंतु रक्त संकलनाची सोय नसल्यामुळे रक्तदाते असतानाही बरीच धावाधाव करावी लागत होती. धारणीपासून अमरावतीचे अंतर सुमारे दीडशे किलोमीटर आहे. ऐनवेळी एवढ्या लांब धावपळ करणे शक्य होत नसल्याने बरेचदा रुग्णांवर नुकसान सहन करण्याचीही वेळ ओढवली आहे. मुळात मेळघाटच्या धारणी किंवा चिखलदरा येथे रुग्ण दाखल झाला आणि त्याला रक्ताची गरज असेल तर थेट अमरावतीच रेफर केले जायचे. दरम्यान ज्या रुग्णांना अमरावतीपर्यंत पाठविणे शक्य होत नव्हते, त्यांच्यासाठी अनेक अडथळे पार करुन डॉक्टरांना रक्ताची सोय करुन घ्यावी लागत होती. आता धारणीतच रक्तपेढी सुरु झाल्याने या अडथळ्यांवरही मात करणे शक्य झाले आहे.

### पहिल्या रक्तदान शिबिराचेही आयोजन

रक्तपेढी सुरु झाल्यानंतर दोन दिवसांपूर्वी येथे पहिले रक्तदान शिबिरही घेण्यात आले. डॉ. आशिष सातव त्यांचे सहकारी चालवत असलेल्या 'महान' संस्थेमार्फत हे शिबीर घेण्यात आले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे रक्तपेढीचे प्रमुख डॉ. अमीत क्षार यांनी सांगितले.

# बहिरम यात्रा; २६५ भूखंडांचा लिलाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११परतवाडा**

चांदूर बाजार पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या श्री क्षेत्र बहिरम येथील दीड महिना चालणाऱ्या यात्रेला २० डिसेंबरपासून प्रारंभ होत आहे. या यात्रेत येणारे व्यावसायिक व व्यापा-यांना दुकाने लावण्याकरिता जिल्हा परिषद प्रशासनाकडून एकूण - ६८५ भूखंडांची लिलाव पद्धतीने विक्री केली जाणार आहे. यातील काही भूखंड महिला बचत गटासाठी आरक्षित ठेवले आहे. सोमवारी बहिरम येथे या भूखंडांची लिलाव प्रक्रिया पोलिस बंदोबस्तात करण्यातआली. पहिल्याच दिवशी २६५ भूखंडांच्या लिलावातून जि. प. प्रशासनाला ११ लाख ७२ हजारांचा महसूल प्राप्त झाला आहे.

विशेष म्हणजे जि.प. प्रशासनानेहा लिलाव करत असताना सर्वच व्यावसायिक, व्यापाऱ्यांना व दुकानदारांना संधी दिली. लिलाव प्रणालीत सहभागी झालेला जो व्यक्तीत जास्तीत जास्त बोली लावेल, अशा व्यावसायिकांना हे भूखंड स्पर्धात्मक प्रणालीतून देण्यात आले.

# आमदाराच्या विशेष प्रयत्नातून मतदारसंघाला आठ रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेत दाखल

## रुग्णांसाठी रुग्णवाहिका ही सेवा अत्यंत महत्त्वाची : प्रताप अडसड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११चांदुर रेल्वे**

रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे बिद्र वाक्य लक्षात घेत व कोरोना काळात रुग्णवाहिका ची कमतरता व त्यामुळे रुग्णांचे झालेली असुविधा बघता धामणगाव विधानसभा मतदारसंघाचे



आमदार प्रताप अडसड यांनी विशेष प्रयत्न करून राज्य शासनाकडून मतदार संघातील तिन्ही तालुक्यात करिता आठ रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेकरीता उपलब्ध करून दिल्या, त्याचे लोकार्पण सोहळा आज बुधवार,११/१२/२०२४ रोजी तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय चांदूर रेल्वे येथे थाटात पार पडले, यावेळी मंचावर आमदार प्रताप अडसड, तालुका वैद्यकीय अधिकारी निकोसे मॅडम, विस्तार अधिकारी विधाते, तालुका आरोग्य अधिकारी माधुरी दुबे,डॉ शिरसागर,डॉ मालखेडे पंचायत समिती सभापती प्रशांत भेंडे, बंडू भुते, आदीं पाहुणे हजर होते,रुग्णवाहिका ही रुग्णांच्या सेवेकरीता देण्यात आलेली आहे या संदर्भात कोणी हया गया केल्यास ते खपून घेतले जाणार नाही कारण रुग्णांसाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची सेवा आहे असे यावेळी आमदार यांनी संबंधितांना सुचवले.

कोरोना काळात रुग्णांकरिता रुग्णवाहिकांची झालेली कमतरता पाहता आपल्या मतदारसंघा करिता चांगल्या उत्तम दर्जाची रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी म्हणून धामणगाव विधानसभेचे आमदार प्रताप अडसड यांनी शासनाकडे पाठ पुरवठा करून मतदार संघातील तिन्ही तालुक्याकरिता आठ रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेकरिता उपलब्ध करून दिल्या, त्यापैकी एक रुग्णवाहिका ही चांदुर रेल्वे ग्रामीण रुग्णालय करिता तर आमला विश्वे,पळसखेड या रुग्णालयाकरिता एक एक रुग्णवाहिका देण्यात येणार आहे, या व्यतिरिक्त धामणगाव तालुक्यातील तळेगाव दशासर मंगरूळ दस्तगीर, व अंजनसिंगी, या ग्रामीण रुग्णालय एक एक रुग्णवाहिका देण्यात आली आहे या व्यतिरिक्त नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सातारगाव आणि धामक या रुग्णालय करिता सुद्धा प्रत्येकी एक एक रुग्णवाहिका आज रोजी देण्यात आले आहे, येणाऱ्या काळात मतदार संघातील लोणी,पापड,आणि वाढोणा या गावातील रुग्णालय करिता सुद्धा रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे मानस सुद्धा आमदार प्रताप अडसड यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.

# राज्यात १८ डिसेंबरपर्यंत थंडीचा कडाका जाणवणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ मुंबई**

उत्तरेकडील राज्यांमध्ये १० ते १४ डिसेंबर पर्यंत थंडीची लाट कायम राहणार आहे. त्यामुळे उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेमुळे महाराष्ट्रात देखील त्याचा परिणाम दिसून येत आहे. उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात थंडी वाढली आहे. येत्या दोन ते तीन दिवसात तापमानात कमलीची घसरण होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यात इतर भागात देखील तापमानात घसरण होण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

नाशिक जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी हलक्या स्वरुपात पाऊस पडला होता. त्या काळात ढगाळ वातावरणामुळे नागरिकांना थंडीपासून थोडा दिलासा मिळाला होता. मात्र आता थंडीचा जो पुन्हा एकदा वाढला आहे. नाशिक जिल्ह्यातील तापमान ८ अंशावर घसरले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नाशिकमध्ये हाडं गोठवणारी थंडी पडली आहे. पुढील पाच दिवस देखील नाशिकमध्ये असेच वातावरण कायम राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील जवळपास सर्वच भागामध्ये तापमान घसरले आहे. मुंबई, नाशिक, जळगाव, नंदुरबार




जिल्ह्यात तापमान घसरले असून नाशिक जिल्ह्यामध्ये सर्वात कमी तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

उत्तर भारतात आलेल्या पश्चिमी चक्रवातामुळे हिमवर्षाव होत आहे. तसेच वाहणाऱ्या गार वाऱ्यामुळे मध्य प्रदेशापर्यंत थंडीची लाट असून त्याचा परिणाम म्हणून उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यात थंडीचा कडाका आहे. मंगळवारी राज्यात धुळ्यात नीचांकी ४.० अंश सेल्सिअस तर छत्रपती संभाजीनगरात १२.२ अंश सेल्सियस तापमान होते. आगामी तीन दिवस उत्तर महाराष्ट्रासह राज्यभरात थंडीची लाट तीव्र होणार असून राज्यात १८ डिसेंबरपर्यंत थंडीचा कडाका रहाणार आहे. काही ठिकाणी दवबिंदू गोठण्याची (भू-स्फटिकीकरण) शक्यता असल्याचा अंदाज हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिला आहे.

### सातपुड्याच्या कुशीत शेत शिवारात बर्फाची चादर

सातपुड्याच्या कुशीत अतिदुर्गम भागात वसलेल्या डाब गावात (ता. अक्कलकुवा) मंगळवारी दवबिंदू गोठल्याने शेत शिवारात बर्फाची चादर पसरल्याचे दिसून आले. स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास सपाटीपेक्षा तीन ते चार अंशाने येथे तापमान कमी असते.

# नवनीत राणांचे पुनर्वसन होणार; राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे राज्यात परतण्याच्या जोरदार चर्चा

## डॉ. बोंडेंची पालकमंत्री पदी वर्णी लागण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. महायुती सरकार सत्तेत येऊन ५ दिवस उलटले, तरीही खातेवाटप जाहीर झालेलं नाही. खातेवाटपाच्या चर्चा सुरु असताना राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे यांना राज्यात मंत्री म्हणून आणण्याच्या हालचाली भाजपनं सुरु केल्या आहेत. त्यांच्या जागी नवनीत राणांना संसदेत पाठवलं जाऊ शकतं.

नवनीत राणा २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्या. अमरावती मतदारसंघातून त्या अपक्ष निवडून आल्या. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. जिल्ह्यातील भाजप नेते, कार्यकर्ते यांच्यासह महायुतीच्या नेत्यांचा विरोध असतानाही त्यांचा पक्षप्रवेश झाला. त्यांना उमेदवारी दिली गेली. पण काँग्रेसच्या बळवंत वानखेडे यांनी त्यांचा पराभव केला. राणा यांची भूमिका भाजपला पूरक राहिलेली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी हनुमान चालिसा पठणाचा मुद्दा गाजवला होता. त्या सातत्यानं ठाकरेंना लक्ष्य करतात. लोकसभेतील पराभवानंतर त्या संसदेत जाण्यास उत्सुक आहे. त्यांची ही मागणी लवकरच पूर्ण होऊ शकते.




अमरावतीमधील भाजपचे नेते अनिल बोंडेंनी फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात कृषी मंत्री म्हणून काम केलं आहे. नवनीत राणा यांच्याप्रमाणेच ते देखील आक्रमक नेते आहेत. आता या दोन आक्रमक नेत्यांना भाजप एक्स्चेंज करण्याच्या तयारीत आहे. बोंडेंना दिल्लीतून राज्यात पुन्हा आणण्यात येईल. त्यांना फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातही स्थान दिलं जाण्याची दाट शक्यता आहे. बोंडे यांच्या रिक्त झालेल्या जागेवर राणा यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे.

अमरावतीत पहिल्यांदाच भाजपचे पाच आमदार निवडून आलेले आहेत. या विजयात बोंडे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे बोंडेंना पुन्हा राज्यात आणून त्यांना मंत्री करण्याचा भाजप नेतृत्त्वाचा मानस आहे. बोंडे यांच्या रुपात अमरावतीला मंत्रिमंडळात स्थान मिळेल. बोंडे ५ जुलै २०२२ रोजी राज्यसभेवर गेले. त्यांचा कार्यकाळ २०२८ पर्यंत आहे. त्यामुळे त्यांच्या जागी खासदार होणाऱ्या राणांना साडे तीन वर्षांचा कार्यकाळ मिळेल. सध्याच्या घडीला महायुतीकडे असलेलं संख्याबळ पाहता राणा पोटनिवडणुकीत आरामात विजयी होतील.

नवनीत राणांना राज्यसभेवर संधी दिल्यास काँग्रसचे खासदार बळवंत वानखेडेंची अस्वस्थता वाढू शकते. राणांना खासदारकीचं बळ असल्यास त्या वानखेडेंना आव्हान देण्याची कामगिरी करु शकतात. राणांच्या बदल्यात राज्यात येणाऱ्या बोंडेंना मंत्रिपदाचा अनुभव आहे. त्याचा फायदा भाजपला होईल. राज्य विधान परिषदेच्या ६ जागा रिक्त झालेल्या आहेत. त्यामुळे बोंडेंना मंत्रिपदी संधी दिल्यास त्यांना ६ महिन्यांत विधिमंडळाचं सदस्य करूण घेणं भाजपसाठी अवघड नसेल.असे झालेच तर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची माळ हि डॉ. अनिल बोंडे यांच्या गळ्यात पडण्याची शक्यता आहे.

# व्हॉट्सअॅपवर लग्नाची पत्रिका आली असेल तर सावधान! ए पी के फॉरमॅट असेल तर सावधच रहा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

ऑनलाइन पत्रिकेच्या माध्यमातून व्हायरस मोबाइलमध्ये शिरवून अनेकांच्या बँक खात्यांवर डल्ला मारण्यात आला आहे. लग्नाचा सीझन सुरू झाला आहे. लग्नाची पत्रिका व्हॉट्सअॅपसारख्या सोशल मीडिया माध्यमांवर पाठवण्याचा नवा ट्रेंड सुरू झाला आहे. लग्नपत्रिका पाठवण्याचा हाच सोपा मार्ग समजला जातो. पण लग्नाची हीच पत्रिका आता लुटीचं माध्यम बनली आहे. आतापर्यंत बँकेतून बोलतोय किंवा तुमचं बँक खातं बंद होईल अशी भीती दाखवून तुमच्या बँक खात्यांची माहिती मिळवली जात होती. पण आता सायबर भामट्यांनी लुटीसाठी नवी क्लृप्ती शोधून काढलीय. चक्क लग्नाची एपीके फाइल पाठवून मोबाइलधारकांच्या लुटीचा नवा फंडा सुरू केला आहे.उत्सुकतेपोटी आलेली लग्नपत्रिका आपण कोणत्याही खात्रीशिवाय उघडतो. लग्नपत्रिकेच्या नावाखाली आलेला व्हायरस आपल्या मोबाइलमध्ये शिरतो. एकदा का मोबाइलमध्ये लग्नाची एपीके फाइल उघडली की व्हायरस आपलं काम करण्यास सुरुवात करतो. लग्नपत्रिका उघडल्यावर अगदी काहीवेळात आपला मोबाइल बंद पडतो. आपण जेव्हा फोन पुन्हा सुरु करतो तोपर्यंत मोबाइलमधील सगळ्या सेटिंग्ज बिघडलेल्या असतात.याचवेळी सायबर दरोडेखोर मोबाइल मॅसेजिंग सिस्टिम हॅक करतात. गुगल पे, फोन पे या पेमेंट अॅपचाही ताबा घेतात. इन्स्टाग्राम,असते.




फेसबुक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे पासवर्ड मिळवले जातात. फोटो गॅलरीतले फोटोही सायबर गुन्हेगारांच्या ताब्यात जातात. काही घटनांमध्ये मोबाइलमध्ये सेव्ह केलेल्या आधार कार्ड, पॅन कार्डचाही गैरवापर केला जातो.सायबर गुन्हेगार बँक खात्यातल्या रकमेवर डल्ला मारण्याचा प्रयत्न करतात. बँक अकाउंट रिकामं केले जाते. गुगल पे आणि फोन पेवरून ऑनलाइन खरेदीही केली जाते. ऑनलाइन क्रेडिट कार्डाचा वापर परदेशात खरेदी करण्यासाठी वापरला जातो. याचा पत्ताही लागत नाही. कारण खरेदीचे अलर्ट देणारी मॅसेजिंग यंत्रणाही त्यांनी ताब्यात घेतलेली असते.

**खात्री करून घ्या**


मोबाइलवर अनोळखी नंबरवरून आलेली लग्नपत्रिका उघडू नका. एपीके फॉरमॅटमधील फाइल उघडण्याचा विचारच करू नका. एखाद्या मित्राची नातेवाइकाच्या नावे लग्नपत्रिका आल्यास पहिल्यांदा फोन करून खात्री करून घ्या. अन्यथा मित्र आणि नातेवाइकाच्या लग्नाच्या आनंदात तुम्ही कंगाल व्हाल.

# पीक नोंदणी वेबसाइट बंद; जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हाल

## ई–पीक नोंदणीसाठी वेबसाइट सुरू करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

पीक नोंदणी करण्यासाठी असलेली वेबसाइट बंद झाल्याने शेतकरी शासनाच्या लाभापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. राज्य शासनाने बंद केलेली साईट त्वरित सुरू करण्याची मागणी शेतकरी करीत आहे.




शेतकऱ्यांना ई–पीक नोंदणी करणे गरजेचे असते. यावर्षी काही शेतकऱ्यांनी ई–पीक नोंदणी केली नाही. मात्र, अनेक शेतकऱ्यांची तलाठ्यांकडून ई–पीक नोंदणी करण्यात आली नाही.अनेक शेतकऱ्यांची अर्धवट ई– पीक नोंदणी झाली आहे. ई– पीक नोंदणी व त्याच्या दुरुस्तीसाठी मंडळ अधिकाऱ्यांची शासनाने नियुक्ती केली आहे.मात्र गेल्या वीस दिवसांपासून शासनाची वेबसाईट बंद झाल्यामुळे अनेक शेतकरी ई–पीक नोंदणीपासून वंचित आहेत.

ई–पीक नोंदणीअभावी अशा शेतकऱ्यांना आता खरेदी केंद्रावर पिकांची नोंदणी करता येत नाही.राज्य महाराष्ट्र शासनाने बंद केलेली वेबसाइट तत्काळ सुरू करावी व ई–पीक नोंदणी करावी, अशी मागणी अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# हिवाळी अधिवेशनासाठी २० हजार अधिकारी, कर्मचारी नागपुरात मुक्कामी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन अवघ्या एका आठवड्यावर आले असताना, प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. हिवाळी अधिवेशनासाठी १८ ते २० हजार अधिकारी–कर्मचारी नागपुरात पोहोचणार आहेत. त्यांच्या निवासाची व्यवस्था विविध निवासी इमारती, शासकीय गेस्ट हाऊस, लॉज आणि वसतिगृहांमध्ये करण्यात येत आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाने यासाठी निवासव्यवस्था पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यानुसार हिवाळी अधिवेशनासाठी येणारे मंत्री, राज्यमंत्री, व्हीआयपी, आमदार, अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा अधिकारी, पोलिस कर्मचारी, वाहनचालक आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासाची व्यवस्था करावी लागणार आहे. त्यासाठीचे नियोजन सुरू आहे.

**रवी भवनमधील बंगले तयार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी रामगिरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी देवगिरी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी विजयगड बंगला तयार करण्यात आला आहे.

विधानसभा अध्यक्ष, उपसभापती, विधान परिषद सभापती, उपसभापती आणि विरोधी पक्षनेत्यांसाठी रवी भवनात बंगले तयार झाले आहेत. मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला नाही. रवी भवनमधील २४ बंगले आणि नागभवनमधील १६ बंगले मंत्री व राज्यमंत्र्यांच्या प्रतीक्षेत आहेत.

**मोर्चात येणाऱ्यांसाठी सद्भावना लॉन**

हिवाळी अधिवेशनात मोर्चात येणाऱ्यांसाठी जाफरनगर येथील सद्भावना लॉनही ताब्यात घेण्यात आले आहे. सुमारे दोन हजार लोकांसाठी येथे व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दाभा येथे पाच हजार लोकांसाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

# ताई, संकटात आहात, मग मदतीसाठी डायल करा १८१

## महिलांसाठी हेल्पलाइन : योजनांची देखील मिळणार माहिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

संकटग्रस्त, पीडित महिलांना तातडीने मदत मिळावी, याकरिता १८१ ही स्वतंत्र हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे महिलांनी संकटसमयी शासनाच्या हेल्पलाइनवर संपर्क केल्यास लगेच मदत मिळेल. यासोबतच विविध योजनांची देखील माहिती होणार आहे.

यापूर्वी देखील महिलांसाठी ही हेल्पलाइन सुरू होती. मात्र, सदर हेल्पलाइन मुख्यमंत्री हेल्पलाइनमध्ये विलीन असल्याने मुख्यमंत्री हेल्पलाइनकडे संकटग्रस्त, पीडित महिलांचे कॉल्स येत होते. महिलांशी संबंधित कॉल्सकरिता आवश्यक माहितीच्या अनुषंगाने प्रशिक्षित कर्मचारी तसेच पुरेशी माहिती उपलब्ध नव्हती. यामुळे अशा महिलांना आवश्यक ते साहाय्य तत्काळ उपलब्ध करून देणे शक्य होत नव्हते, तसेच महिलांविषयक कॉल्सची आकडेवारी महिला व बाल विकास विभागाला उपलब्ध होत नव्हती. या सर्व बाबींचा विचार करून केंद्र शासनाच्या मिशन शक्ती या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महिला व बाल विकास विभागाने महिलांसाठी १८१ ही स्वतंत्र टोल फ्री हेल्पलाइन सुरू केली आहे. या हेल्पलाइनवर पोलिस, अग्निशमन, रुग्णवाहिका, वन स्टॉप केंद्र आदी आपत्कालीन सेवा, शासकीय योजना, मानसिक सामाजिक समुपदेशन, महिलांविषयक कायदे, संपत्तीविषयक कायदे आदींची माहिती मिळणार आहे.

### २४ तास टोल फ्री हेल्पलाइन

राज्य शासनाने सुरू केलेली १८१ ही हेल्पलाइन २४ तास सुरू राहणार आहे. त्यामुळे संकटसमयी मदत हवी असल्यास कोणत्याही वेळी महिलांना हेल्पलाइनवर संपर्क साधता येतो. बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, संरक्षण अधिकाऱ्याशी संपर्कासाठी मदत, हुंडा प्रतिबंधक, बालविवाह, संरक्षण अधिकारी, चाइल्ड लाइनच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावयाचा असल्यास या हेल्पलाइनद्वारे आवश्यक ती मदत केली जाणार आहे. संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळावी यासाठी १८१ ही स्वतंत्र हेल्पलाइन जिल्ह्यात सुरू झाली आहे. महिलांना मदतीसोबतच विविध योजनांची देखील याद्वारे माहिती मिळणार आहे. त्यामुळे महिलांनी हेल्पलाइनची मदत घ्यावी.

### अशी राहील हेल्पलाइन

महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या स्वतंत्र हेल्पलाइनसाठी मानक कार्यप्रणाली तयार करण्यात आली आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ नेमण्यात आले आहे. हेल्पलाइनवर कॉल्स धडकताच लगेच पुढील कार्यवाही सुरू होते.

# प्रथम १२, नंतर १३ आणि आता १५, फडणवीसांच्या नागपूर दौऱ्याचा मुहूर्त का लांबला?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

पाच वर्षात तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे नागपूरकर देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दौऱ्याचा मुहूर्त वारंवार टळत आहे. पूर्वी १२ डिसेंबरला ते नागपूरला येणार होते, नंतर ही तारीख १३ डिसेंबर झाली आणि आता १५ डिसेंबर झाली आहे.

फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने नागपूरच्या भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. कधी ते नागपुरात येतात आणि कधी त्यांचा भव्य स्वागत समारंभ आयोजित केला जातो, असे स्थानिक नेते व कार्यकर्त्यांचे झाले आहे. पूर्वी १२ डिसेंबरला ते येणार म्हणून स्वागत समारंभाची तयारी करण्यात आली होती. स्वागत समिती स्थापन करण्यात आली होती. विमानतळ ते त्यांचे धरमपेठेतील निवासस्थान असा त्यांच्या मिरवणुकीचा मार्ग निर्धारित करण्यात आला होता. मात्र १० तारखेला संध्याकाळी फडणवीस यांच्या दौऱ्यात बदल झाल्याने व ते १२ ऐवजी १३ डिसेंबरला येणार, असे शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी जाहीर केले. १३ तारखेला फडणवीस यांचा जंगी सत्कार होणार म्हणून कार्यकर्ते कामाला लागले असतानाच ते आता १५ डिसेंबरला येणार असे त्यांच्या स्थानिक कार्यालयाकडून सांगण्यात आले.. १६ तारखेपासून विधिमंडळाचे अधिवेशन आहे. त्याच्या पूर्वसंध्येला संपूर्ण सरकारच नागपूरमध्ये येते. दिवसभर कॅबिनेटची बैठक, विरोधी पक्षाचे चहापाणी आणि संध्याकाळची पत्रकार परिषद असे बरेच कार्यक्रम दिवसभर असतात. या काळात त्यांचे स्वागत व सत्काराला वेळ मिळण्याची शक्यता कमी आहे.



# अमरावतीत बेकायदा वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करा

## शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांची मागणी : पोलिस आयुक्तांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर भारतात बेकायदा व बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा मुद्दा पुढे आला असून पोलीस प्रशासनाने अमरावती शहरातील विविध भागात कथितरित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी आणि त्यांची देशातून हकालपट्टी करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून करण्यात आली असून या मागणी संदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचे नेतृत्वात पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांना निवेदन सादर करण्यात आले.अमरावती शहरातील विविध भागात काही बांगलादेशी नागरिक आपली ओळख लपवून व बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीरपणे वास्तव्यास असल्याची माहिती असून ते बांगलादेशी विविध उद्योग व एमआयडीसी मधील फॅक्टरीमध्ये कार्यरत असल्याचे समजते. अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून आणि कुठलीही अप्रिय घटना होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने मोहीम राबवित शहरात बेकायदा वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घ्यावा आणि त्यांच्यावर कडक कारवाई करीत त्यांची देशातून हकालपट्टी करावी अशी मागणी यावेळी सुनील खराटे यांनी केली. यावेळी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेडी यांनी सविस्तर चौकशी करून शहरात



बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेऊन कारवाई करण्यात येईल अशी ग्वाही शिवसेनेच्या शिष्टमंडळास दिली.निवेदन देताना सुनील खराटे शिवसेना (उ.बा.ठा.)जिल्हाप्रमुख,अम. यांच्या नेतृत्वात ,सुधीर भाऊ सूर्यवंशी शिवसेना उपनेते तथा संपर्क प्रमुख,अम. प्रतिभाताई बोपशेट्टी, मनीषाताई टेंबरे ,जिल्हा प्रमुख,महिला आघाडी,राजश्री जठाळे,शहर प्रमुख, जयश्री कुऱ्हेकर पंजाबराव तायडे विजय मंडले , सुमित राऊत , रवी अंबळकर कुचीन कैतवास राजू अक्कलवार महेश पवार संदीप इंगोले निलेश सावळे विकास शेळके शिवम पंचवट विजय बेनोरकर शेखर घिमे,प्रकाश बांदे सुमित पुनसे जयंत इंगोले अतुल सावरकर गौरव चांदुरकर सुभाष गायगोले संजय गोंडाने आतिश मेश्राम गोलू तंबोले अमित निंदाणे विकी बाबू आशिष वस्ताद शिवम धेंडवाल निलेश तंबोले यस्तेजी कालो निंदाने सुरेश वानखडे नजीर पठाण राज तंबोले कैलास अवघड महेंद्र नागलकर सतीश सरकटे अतुल सावरकर गौरव चांदुरकर सागर ढोकेउपस्थित होते.

**शिवसेना स्टाईलने निपटणार**

बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराचा आम्ही निषेध करीत असून केंद्र सरकारने या संदर्भात कडक भूमिका घ्यावी अशी आमची मागणी आहे. येत्या आठ दिवसात पोलीस प्रशासनाने अमरावती शहरातील बांगलादेशी नागरिकांना हुडकून न काढल्यास आम्ही शिवसेना स्टाईलने बेकायदा राहणाऱ्या बांगलादेशींना शोधून त्यांचा समाचार घेऊ असा इशारा सुनील खराटे यांनी याप्रसंगी दिला.

**मुस्लिम समाज बांधवांना आवाहन**

अमरावती शहरात राहणाऱ्या मुस्लिम समाज बांधवांनी बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांची माहिती पोलिसांना किंवा आम्हाला द्यावी जेणेकरून तुम्हाला त्रास होणार नाही असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केले आहे.